बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकः बाळासाहेब मस्के


बीड | बुधवार, दि.७ ऑगस्ट २०२४ | वर्षे ४ रे | अंक ९ ला | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

### राज्यपाल केलं नाही तर...

मुंबई : राज्यपालपदासाठी आठ-दहा दिवस वाट पाहणार अन्यथा नवनीत कौर राणा यांचं जातवैधता प्रमाणपत्राचं प्रकरण बाहेर काढणार, असा इशारा माजी खासदार आनंदराव अडसूळ यांनी भाजपाला दिला आहे. अडसूळ म्हणाले, नुकतीच राष्ट्रपती कार्यालयाने नव्या राज्यपालांची एक यादी प्रसिद्ध केली आहे. यात आठ ते दहा जणांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये कुठेही माझं नाव नाही. याबाबत मी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी बोललो. त्यांना आठवण करून दिली की आपल्याला त्यांनी (भाजपाने) काय आश्वासन दिलं होतं. सध्या मी संयम ठेवला आहे. अजून आठ-दहा दिवस संयम ठेवेन, थोडी वाट पाहणार आहे, अन्यथा मी सर्वोच्च न्यायालयात क्युरेटीव्ह याचिका दाखल करणार आहे.

# आरक्षण घेण्यासाठी आता एकच पर्याय!!

## आरक्षण : मनोज जरांगेंचं मोठं विधान; म्हणाले, 'सत्तेत' जावं लागेल



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

मराठा आणि ओबीसी आरक्षणाचा प्रश्न गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहे. मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्याची मागणी केली आहे. त्यासाठी मनोज जरांगे यांनी अनेकदा उपोषण, आंदोलनंही केलं. मात्र, अद्याप मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्याच्या निर्णयासंदर्भात राज्य सरकारने कोणताही ठोस निर्णय घेतलेला नाही. यातच मनोज जरांगे यांनी केलेल्या मागणीला ओबीसी नेत्यांनी विरोध केल्यामुळे सध्या आरोप-प्रत्यारोपाचं राजकारण सुरु आहे. अशातच मनोज जरांगे पाटील यांनी महायुतीच्या सरकारला पुन्हा एकदा इशारा देत सूचक विधान केलं.

आरक्षण घेण्यासाठी आमच्याकडे दुसरा पर्याय नाही, आता सत्तेत गेल्याशिवाय पर्याय नाही, असं सूचक विधान मनोज जरांगे यांनी केलं आहे. सर्वच पक्षांच्या मराठा समाजाच्या आमदारांनी त्यांना समजावून सांगणं गरजेचं आहे. आमचं हक्काचं ओबीसीमधून आरक्षण आम्हाला द्या. कारण आरक्षण देण्याचं केंद्र सत्ता आहे आणि सध्या सत्तेत ते आहेत. ते जर देणार नसतील तर आमच्यासमोर आरक्षण घेण्यासाठी दुसरा पर्याय काय? आता आमच्यापुढे एकच पर्याय, सत्तेत गेल्याशिवाय पर्याय नाही. गोरगरीबांना देणारं बनल्याशिवाय पर्याय नाही. त्यामुळे आम्हाला नाव ठेवायचं नाही की, तुम्ही राजकारणात गेला आहात. एवढ्या वेळेस सत्तेत जायची संधी आहे. राजकारण्यांना पायाखाली तुडवायची ही योग्य वेळ आहे, असंही मनोज जरांगे यावेळी म्हणाले. ते एबीपी माझाशी बोलत होते.गेल्या काही दिवसांपासून राजकारण ढवळून निघालेलं नाही तर ढवळून काढलं आहे. सरकारने सत्तेचा गैरवापर केला आणि मराठ्यांच्या अंगावर ओबीसींचे नेते घातले. अशा प्रकारची सत्ता कधीही याआधी लोकांनी पाहिली नव्हती, असा हल्लाबोलही मनोज जरांगे यांनी केला. मला मराठा समाजाविरोधात बोललं की सहन होत नाही. त्यामुळे त्यांनी सर्वांनी मिळून मला टार्गेट करायचं ठरवलं. त्यांना माहिती आहे की समाजाच्या प्रश्नांसाठी हा ताकदीने लढतो. याला तेथून बाजूला करायचं. त्यामुळे हे सर्व एकत्र आले आहेत. माझ्या विरुद्ध सर्वांनी षडयंत्र रचलं आहे. देवेंद्र फडणवीस यांनी अशा पाच ते सहा टोळ्या उभ्या केल्या आहेत. पण त्याचा काहीही फायदा होणार नाही, असंही मनोज जरांगे म्हणाले.

### मनोज जरांगेंची शांतता रॅली

मराठा आरक्षणासाठी लढा देत असलेल्या मनोज जरांगे यांनी आता शांतता रॅलीच्या दुसऱ्या टप्प्याला सुरुवात केली आहे. सोलापूरमधून ७ ऑगस्टपासून शांतता रॅलीच्या दुसऱ्या टप्प्याला सुरुवात होणार आहे. या रॅलीची सांगता नाशिकमध्ये होणार आहे. ही रॅली पश्चिम महाराष्ट्रातील ७ जिल्ह्यामधून जाणार आहे. याआधी मनोज जरांगे यांनी मराठवाड्यात शांतता रॅली काढली होती.



## विनेश फोगटने घडवला इतिहास

### क्रीडांगण: ठरली पहिली महिला कुस्तीपटू

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताचं चौथं पदक निश्चित झालं आहे. भारताची धाकड कुस्तीपटू विनेश फोगटने कुस्तीच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे . ५० किलो कुस्तीच्या उपांत्य फेरीत विनेश फोगटचा सामना क्युबाच्या युस्नेलिस गुझमन लोपेझशी झाला. या सामन्यात विनेश फोगटने ५-० असा विजय मिळवला आणि अंतिम फेरी गाठली. अंतिम फेरीत पोहोचणारी ती पहिली भारतीय महिला कुस्तीपटू आहे. अंतिम फेरीत धडक मारल्यानंतर तिने भारताचे सुवर्ण किंवा रौप्य पदक निश्चित केले आहे. उपांत्य सामन्यात विनेश फोगटने पहिला गुण मिळवला होता. पहिल्या फेरीत विनेश फोगटने क्युबाच्या युस्नेलिस गुझमन लोपेझला एकही संधी दिली नाही. क्युबाच्या लोपेझने विनेश फोगटच्या पायांवर सातत्याने आक्रमण करण्याचा प्रयत्न केला, परंतु विनेश फोगटच्या चांगल्या बचावामुळे तिला गुण मिळवता आला नाही. यानंतर विनेश फोगटने सलग दोन गुण घेत सामन्यात ५-० अशी आघाडी घेतली. सामन्याच्या अखेरीस युस्नेलिस गुझमन लोपेझने पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला, परंतु विनेश फोगटने तिला कोणतीही

पान २ वर...

## बीड पालिकेला शिवसंग्रामने घेतले फैलावर!

### निवेदन: डॉ.ज्योती मेटे म्हणाल्या नागरिकांचे प्रश्न सोडवा अन्यथा मोर्चा

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

आज बीड नगरपालिकेत कमाल चा रडा पाहिला मिळाला. शहरातील विविध भागातील नागरिक, महिला यांना सोबतीला घेऊन विविध समस्ये संदर्भात बीड शहर शिवसंग्रामचे शिष्टमंडळ मुख्यअधिकारी यांना निवेदन देण्यासाठी बीड नगरपरिषद येथे गेले असता तिथे निवेदन घेण्यासाठी मुख्याधिकारी नसल्याने शिवसंग्रामचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक कमालीचे आक्रमक झाले. शहरात एवढ्या समस्या असताना मुख्याधिकाऱ्यांना नागरिकांच्या समस्या ऐकून घेण्यासाठी वेळ नाही का? असे म्हणत घोषणाबाजी करत शिष्टमंडळाने मुख्याधिकारी यांच्या



कार्यालयातच ठिय्या आंदोलन केले. यानंतर या ठिकाणी पोलिसांचे पाचारण करण्यात आले , पोलिसांच्या मध्यस्थीनंतर निवेदनकर्त्यांचे आक्रमकता पाहता तब्बल दीड तासानंतर मुख्यअधिकारी निवेदन घेण्यासाठी नगरपालिकेत दाखल झाल्या त्यानंतर शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ. ज्योती विनायकराव मेटे यादेखील नगरपालिकेत दाखल झाल्या आणि त्यांनी नागरिकांच्या समस्या मुख्याधिकारी यांना सांगितल्या हे सर्व घडत असताना नगरपालिकेत तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. शिवसंग्रामच्या कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत नगरपालिकेचा परिसर दणाणून सोडला होता. यावेळी शिवसंग्राम ज्येष्ठ नेते प्रभाकर कोलंगडे, जिल्हाध्यक्ष नारायणराव काशीद, शहराध्यक्ष सुहास पाटील, तालुका अध्यक्ष नवनाथ प्राभाळे यांच्यासह शिवसंग्राम पदाधिकारी , कार्यकर्ते , शहरतील नागरिक महिला मोठ्या संख्येने

पान २ वर...

### स्वच्छतेसाठी शासनाकडून निधी नाही

बीड शहराच्या स्वच्छतेसाठी, घनकचरा व्यवस्थापनासाठी इतर नगरपालिकांना राजकीय वरदहस्ता मुळे पाच कोटी रुपये मिळाले आहेत. परंतु बीड नगरपालिकेला हा निधी मिळाला नाही. अधिकाऱ्यांकडून हे उत्तर मिळाल्याने बीडच्या राजकीय पुढार्यांच्या उदासीनतेचे लक्तरे वेशीला टांगली गेली आहेत.

## परळी रेल्वे प्रश्नांवर रेल्वेमंत्र्यांना निवेदन

### मागणी : काँग्रेस नेत्यांनी घेतली भेट

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी परभणी रेल्वे दुपदरीकरणासाठी जमीन अधिग्रहण, परळी मुंबई रेल्वे अश्या विविध प्रश्न घेऊन रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची खासदार रजनीताई पाटील काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख परळी शहर अध्यक्ष बहादूरभाई यांच्या शिष्टमंडळाने दिल्ली येथील रेल भवन येथे भेट घेऊन निवेदन दिले आहे.

रेल्वेमंत्री यांना जिल्हा काँग्रेसच्या वतीने दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, परळी परभणी रेल्वे दुहेरीकरण करण्यासाठी परळी शहरातील मुख्य गाभा असलेल्या



वस्त्यांचे जमीन अधिग्रहण करण्यासाठी रेल्वे प्रशासनाने काढलेल्या राजपत्रित सूचनेने परळी येथील या वस्त्यांमध्ये गेली ५० ६० वर्षापासून वास्तव्यात असलेल्या हजारो कुटुंबांना बेघर होण्याची

पान २ वर...

## नाथसागर हायड्रो केंद्रातील मशिनरी निकामी

### सवाल : वरिष्ठ अधिकारी वर्गाने लक्ष देण्याची मागणी

पैठण/पुण्यभूमी प्रतिनिधी

पैठणच्या जायकवाडी प्रकल्पावर तत्कालीन मुख्यमंत्री शंकराव चव्हाण व पाटबंधारे खात्याचे वरिष्ठ अधिकारी यांनी अभ्यास करून सर्वांच्या फायदेशीर ठरणाऱ्या जलविद्युत केंद्र ( हायड्रो) देशातील एक उत्कृष्ट ठरणारे जपान सरकारने तयार केलेले जपानी जलविद्युत केंद्र सुरू कले.अतिशय चांगल्या पद्धतीने हे बारा मेगाव्होट हायड्रो केंद्र चाललेही. त्यापासून तयार झालेल्या वीज निर्मितीचा फायदा महाराष्ट्रातील जनतेचा झाला. त्यातून महाराष्ट्र शासनाला कोट्यावधी



रुपयांचे उत्पन्नही मिळाले, पण गेल्या काही वर्षापूर्वी स्थानिक पाटबंधारे खात्याने नाथसागरातून गोदावरी पात्रात पाणी सोडताना जलविद्युत केंद्रात पाणी शिरणार नाही असे नियोजन न करताच पाणी सोडले ते पाणी हायड्रो केंद्रात घुसले आणि हायड्रो केंद्रातील मशिनरी निकामी झाल्याची

पान २ वर...

### आक्रमक : अनुदान वाढीव टप्पा, जुनी पेन्शनसाठी आंदोलन

## बीडमध्ये मुख्याध्यापक उतरले रस्त्यावर!

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्यातील सर्व अशंतः अनुदानीत, विनाअनुदानीत शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना अनुदानाचा वाढीव टप्प्याचा तातडीने शासनादेश काढून किमान एका महिन्याचा तरी पगार सर्व शिक्षकांच्या खात्यावर द्यावा, राज्यातील सर्व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी या प्रमुख मागण्यासह अन्य मागण्यासाठी बीड जिल्हा मुख्याध्यापक संघाच्या वतीने जिल्हाध्यक्ष जालिंदर पैठणे सर आणि रसाळ सर यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालया समोर दुपारी ३ ते ६ या वेळेत धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी जिल्ह्यातील बहुतांश शाळेचे मुख्याध्यापक उपस्थित होते.




महाराष्ट्र राज्यातील प्राथमिक/ माध्यमिक व उच्च माध्यमिक अशंतः अनुदानीत, विनाअनुदानीत शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना अनुदानाचा वाढीव टप्प्याचा तातडीने शासनादेश काढून किमान एका महिन्याचा तरी पगार सर्व शिक्षकांच्या खात्यावर जमा करावा तसेच राज्यातील सर्व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी या प्रमुख मागण्यासह शाळांतील विविध शैक्षणिक समस्या संदर्भात बीड जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघाच्या वतीने जिल्हाध्यक्ष जालिंदर पैठणे सर आणि सचिव विष्णुपंत रसाळ सर यांच्या नेतृत्वाखाली आज मंगळवार दिनांक ०६ ऑगस्ट २०२४ रोजी धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात मुख्याध्यापक संघाच्या पदाधिकाऱ्यांनी मनोगत व्यक्त करताना शिक्षणाबाबत सरकारची किती उदासिनता आहे. याबाबत उहापोह करण्यात आला. यावेळी अनेक मुख्याध्यापकांनी सरकारच्या या उदासिनत धोरणा बाबत तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. त्यानंतर आपल्या न्याय्य आणि रास्त मागण्या मान्य करण्यासंदर्भात घोषणा दिल्या. या घोषणांनी जिल्हाधिकारी कार्यालय आणि परिसर दणाणून गेला. त्या नंतर शिष्टमंडळानेशिष्टमंडळाने आपल्या मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांना आणि शिक्षण सचिवांना देण्यात आले. या निवेदनाद्वारे प्रचलीत धोरणानुसार अनुदान टप्पा तात्काळ लागू करावा,१ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त व १ नोव्हेंबर २००५ नंतर अनुदानावर आलेल्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना जुनी पेंशन योजना लागु करावी, १५ मार्च २०२४ चा सुधारीत संच मान्यता शासन निर्णय रद्द करुन शाळा तेथे मुख्याध्यापक पद हे धोरण असावे,१५ मार्च २०२४ वर्ग ५ वी व ८ वी च्या वर्गाचा दर्जावाढ निर्णय तात्काळ रद्द करावा, शिक्षक कर्मचारी भरती तात्काळ करावी, राज्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना कॅशलेस मेडिकल योजना तात्काळ लागू करावी,

पान २ वर...

## सोनपेठ तालुक्यात अवैध धंदे?

### प्रश्नचिन्ह : पोलिस पाटलांना काही देणेघेणे नाही का?

सोनपेठ/पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुक्यातील ग्रामीण भागातील दारूचा परवाना नसताना देखील हातभट्टी, देशी-विदेशी दारूची विक्री जोमात चालू आहे. तालुक्यातील ऊखळी बु.येथे तर दर चार -पाच घरानंतर विक्री चे दुकान आहे .तर तालुक्यातील सर्वात मोठी व नवाजली जाणारी गावे म्हणजे उखळी बुद्रुक, डिघोळ,नरवाडी करम,डिघोळ तांडा आदी गावांमध्ये दारू विक्रीचा परवाना नसताना देखील सर्रास दारू विक्री होत आहे.

गावातील अवैध दारू बाबात पोलिस पाटलांचे काही देणेघेणे नाही का? असेल तर तालुक्यातील पोलीस स्टेशन यांना कळविण्यात येत नाही असे म्हणावे अन्यथा स्थानिक प्रशासनासह पोलिसांचेही हाथ बरबटलेले आहेत नेमकं गौडबंगाल




काय?असा संतप्त सवाल ग्रामस्थ उपस्थित करीत आहेत.गावातील दुकानात दारूवर एकच गर्दी होत आहे. यामुळे गावातील महिला व शाळकरी विद्यार्थ्यांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. दारुडे दारू पिऊन गावात हैदोस घालत असल्याने सामान्य माणसाला मोठ्या कठीण परिस्थितीचा सामना करावा लागत आहे.वृध्द, शाळकरी , महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना दारुड्यांचा त्रास सोसावा लागत आहे. ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी प्रथम पदावर रुजू होऊन गावाचे नाव लौकिक केले आहे. परंतु जेव्हापासून गावात देशी व अवैध दारू (हातभट्टी)दारूचे दुकाने धाबे झाले तेव्हापासून तरुण पिढी व्यसनाच्या आहारी जाऊन बरबाद झाली. आणि गावाचा विकास मंदावला आहे अनेकांचे संसार उध्वस्त झाले तर अनेकांनी या दारूमुळे जगाचा शेवटचा निरोप घेतला परंतु या अवैध देशी दारूच्या दुकानाकडे पोलिसांनी व स्थानिक प्रशासनाने याकडे मात्र कानाडोळा केला आहे. अनेक वेळा निवेदने देऊन सुद्धा दारू बंद का होत नाही यामध्ये पोलिसांचाच हात आहे की काय असा नागरिकांना प्रश्न पडला आहे. व देशी दारूचे दुकाने भर गावात असल्याने येथील शाळकरी विद्यार्थ्यांना याचा परिणाम होत आहे आणि दारुड्यांची संख्या मात्र, दिवसेंदिवस

पान २ वर...

# लालयेत पंचवर्षाणि...

अनुच्छेद ३७०' निष्प्रभ करण्यातील यश हे 'पर्यटन वाढले' यापेक्षा अधिक भरीव आणि व्यापक असायला हवे. तसे गेल्या पाच वर्षांत घडले का? गृहमंत्री अमित शहा यांनी जम्मू-काश्मीर प्रांतास विशेष दर्जा देणारे 'अनुच्छेद ३७०' रद्द करण्याचा प्रस्ताव संसदेच्या दोन्ही सभागृहांकडून मंजूर करवून घेतला त्यास ६ ऑगस्ट रोजी पाच वर्षे पूर्ण होतात. जम्मू-काश्मीरला 'मुख्य प्रवाहात' (?) आणण्यासाठी त्या राज्याचा विशेष दर्जा काढून घेणे हा(च) उपाय आहे हे भाजप आणि तद्संबंधी विचारधारांचे नेहमीच म्हणणे होते. अयोध्येत 'बाबरी मशिदी'च्या जागी प्रभु श्रीराम मंदिर उभारणे हा जसा भाजप आणि त्या विचारधारांतील अनेकांच्या मते धार्मिक अस्मितेचा मुद्दा होता तसाच जम्मू-काश्मीरचा विशेष दर्जा काढणे त्यांच्या मते राष्ट्रीय अस्मितेसाठी आवश्यक होते. जम्मू-काश्मीरचा विशेष दर्जा काढणे, अयोध्येत राम मंदिर आणि समान नागरी कायदा हे तीन विषय भाजपसाठी अत्यंत भावनिक. त्यांपैकी पहिले दोन पूर्ण झाले. तृतीय विषयपूर्तीच्या आड ताजा लोकसभा निकाल असेल. यातही जम्मू-काश्मीरचा विशेष दर्जा काढण्यात भाजपस अधिक रस होता कारण हा दर्जा देण्यात पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांचे असलेले विशेष योगदान. जमेल तेथून- शक्यतो सर्वच इतिहासातून- पं. नेहरू यांस आणि जम्मू-काश्मीरच्या विशेष दर्जास पुसून टाकणे भाजपच्या पक्षीय अस्मितेसाठीही अत्यंत गरजेचे होते. वास्तविक या अशा अस्मितांस राजकीय फळे कशी लागतात हे आताच्या निवडणुकीत अयोध्येत काय झाले यावरून दिसून आले. इतिहासातही असे अनेक दाखले सापडतील. ते दिले की ''अस्मितेचा प्रश्न हा काही राजकीय नाही; तो राजकारणाच्या वर आहे'', असे चलाख विधान केले जाते. ते ठीक. पण प्रश्न असा की विशेष दर्जा काढून घेतला, अस्मिता सुखावली, आता पुढे काय?

हा प्रश्न भाजपच्या बाबत विशेषत्वाने उपस्थित होतो. त्यामागे प्रमुख कारणे दोन. पहिले म्हणजे पाच वर्षांपूर्वीच्या निर्णयामुळे केवळ जम्मू-काश्मीरचा विशेष दर्जा गेला इतकेच झालेले नाही. तसे करताना या राज्याची दोन शकले केंद्राने केली आणि लेह-लडाख यांस काश्मीरपासून वेगळे केले. वास्तविक राज्यांसंदर्भात जेव्हा असा काही निर्णय करावयाचा असतो तेव्हा तशा अर्थाचा ठराव राज्य विधानसभेत मंजूर व्हावा लागतो. येथे तसे घडले नाही. कारण विधानसभाच अस्तित्वात नव्हती. तेव्हा ते कारण पुढे करत केंद्राने या राज्याचा लचका तोडला. आज परिस्थिती अशी की केवळ जम्मू-काश्मीर हे राज्यच त्यामुळे जायबंदी झाले असे नाही. तर नवे लडाख-लेहदेखील अपंगावस्थेतच जन्मास आले. त्यालाही राज्याचा दर्जा अद्याप मिळालेला नाही आणि जम्मू-काश्मीरबाबतही तशी काही हालचाल दिसत नाही. यामुळे दोनही केंद्रशासित प्रदेशांची सूत्रे केंद्राच्या हाती असून त्यांचा कारभार दिल्लीतील गृह मंत्रालयातूनच हाकला जातो. हे खाते आपल्या हातातील नियंत्रण अन्यांहाती देण्याविषयी किती उत्सुक असते हे देश जाणतोच. हे एक. आणि दुसरे असे की विद्यमान केंद्र सरकार आहेत त्या राज्यांस आहेत ते अधिकार देण्यास तसेही नाखूश असते. याबाबत ''माझे ते माझे आणि तुझे तेही माझे'' असाच विद्यमान सरकारचा दृष्टिकोन. यामुळे खरे तर संघराज्य पद्धतीलाच आव्हान निर्माण झालेले आहे. असे असताना एका नवजात, त्यातही सीमावर्ती आणि त्यातही मुस्लीमबहुल, राज्याहाती विद्यमान सरकारकडून पूर्णाधिकार दिले जाण्याची अपेक्षा करणेच व्यर्थ. तसेच झाले. जम्मू-काश्मीरचा विशेष दर्जा गेला, त्यातून दोन नवे केंद्रशासित प्रदेश कोरून काढले गेले. पण या दोघांस अद्यापही राज्याचा दर्जा मिळालेला नाही. सबब पाच वर्षांनंतर 'अनुच्छेद ३७०' रद्द केल्याचे यश मोजायचे कसे आणि कोणत्या मापदंडाद्वारे हा प्रश्न. त्या प्रांतांत दहशतवाद कमी झालेला आहे का? शेजारील पाकिस्तानमधून होणारी घुसखोरी थांबली वा कमी झाली आहे का? त्या राज्यात गुंतवणुकीचे प्रमाण वाढून उद्योग-धंद्याची भरभराट दिसू लागली आहे का? आपणास प्रशासनात काही स्थान आहे असे स्थानिकांस वाटू लागले आहे का? या प्रश्नांची उत्तरे नकारार्थी असतील तर केवळ 'अनुच्छेद ३७०' रद्द करण्याने फारसे काहीही हातास लागलेले नाही, हे मान्य करावे लागेल. हा विशेष दर्जा रद्द करणे हे साध्य नव्हते. तर जे काही त्या राज्यात करावयाचे आहे त्यासाठीचे एक साधन होते. परंतु अस्मितेच्या आंधळ्या प्रेमात अडकलेल्यांस साध्य आणि साधन यांतील फरक लक्षात आला नाही आणि ''आम्ही कसा विशेष दर्जा रद्द केला'' या आनंदातच सर्व मश्गूल राहिले. धक्कातंत्र हे जणू धोरण असावे असे या सरकारचे वर्तन. जम्मू-काश्मीरचा विशेष दर्जा रद्द करण्याचा निर्णयही असाच धक्कादायकपणे घेतला गेला. पाठोपाठ सर्व विरोधकांना कैद करून आणि इंटरनेट वगैरेवर बंदी आणून या विरोधात फार काही विद्रोह होणार नाही, याचीही काळजी सरकारने घेतली. त्यामुळे सर्व काही सुरळीत पार पडले. तसे ते सुरळीतपणे पार पडावे यासाठी न्यायालयांनीही आपला वाटा उचलला. तेव्हा या 'यशा'नंतरचा महत्त्वाचा प्रश्न : पुढे काय?

# विद्यावेतन हा 'विद्ये'ला पर्याय आहे का?

याहीवेळी केंद्राच्या अर्थसंकल्पात शिक्षण या विषयाला वळसा घालण्याचा प्रघात सुरूच राहिला आहे. शिक्षण हा जगातील सगळ्या देशांसमोरील एक अत्यंत महत्त्वाचा घटक असल्याचे त्या देशांच्या या क्षेत्रातील गुंतवणुकीवरून सहजपणे लक्षात येऊ शकते. भारत मात्र शिक्षणावरील खर्चात आजवर कधीही भरीव वाढ करू शकला नाही. त्यामुळे 'विश्वगुरू' होण्याचे स्वप्न आता कागदावरूनही भुर्रकन उडून जाण्याची शक्यता अधिक.२०१७-१८ या आर्थिक वर्षापासून शिक्षणावरील अर्थसंकल्पीय तरतूद सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या २.७ ते २.९ टक्के एवढ्याच परिघात राहिले आहे. करोना काळातील अनुभवानंतरही राज्यकर्त्यांना शिक्षणाचे महत्त्वच पुरेसे समजू शकलेले नाही, हे या तुटपुंज्या तरतुदीवरून सहज लक्षात येते. यावर्षीच्या अर्थसंकल्पात शिक्षणाबरोबरच रोजगार आणि कौशल्य विकास या विषयांची एकत्रित तरतूद केल्यामुळे फक्त शिक्षणासाठीची तरतूद नेमकी किती, याचा उलगडा होऊ शकत नाही. नालंदा आणि तक्षशिला या परंपरागत भारतीय ज्ञानकेंद्राचा सतत उल्लेख करणाऱ्या राज्यकर्त्यांना अद्यापही त्या गतवैभवाच्या खुणांपासून काही शिकावेसे वाटत नाही. ज्ञानाच्या परंपरेत या देशाने जागतिक पातळीवर काही उच्च दर्जाचे काम करावे, असे जोवर सत्ताधाऱ्यांनाच वाटत नाही, तोवर शिक्षण हा विषय प्रत्येक अर्थसंकल्पात 'ऑप्शन'लाच टाकला जाणार.

विद्यावेतन हा 'विद्ये'ला पर्याय आहे का?

कौशल्य शिक्षण घेणाऱ्यांना काही महिने विद्यावेतन देण्याची आकर्षक घोषणा यंदाच्या अर्थसंकल्पाने केली, तिचा भारही शिक्षणाच्या खर्चावरच टाकला... पण देशाच्या शैक्षणिक प्रगतीचे उद्दिष्ट यामुळे साध्य होणार आहे का?

याहीवेळी केंद्राच्या अर्थसंकल्पात शिक्षण या विषयाला वळसा घालण्याचा प्रघात सुरूच राहिला आहे. शिक्षण हा जगातील सगळ्या देशांसमोरील एक अत्यंत महत्त्वाचा घटक असल्याचे त्या देशांच्या या क्षेत्रातील गुंतवणुकीवरून सहजपणे लक्षात येऊ शकते. भारत मात्र शिक्षणावरील खर्चात आजवर कधीही भरीव वाढ करू शकला नाही. त्यामुळे 'विश्वगुरू' होण्याचे स्वप्न आता कागदावरूनही भुर्रकन उडून जाण्याची शक्यता अधिक.२०१७-१८ या आर्थिक वर्षापासून शिक्षणावरील अर्थसंकल्पीय तरतूद सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या २.७ ते २.९ टक्के एवढ्याच परिघात राहिले आहे. करोना काळातील अनुभवानंतरही राज्यकर्त्यांना शिक्षणाचे महत्त्वच पुरेसे समजू शकलेले नाही, हे या तुटपुंज्या तरतुदीवरून सहज लक्षात येते. यावर्षीच्या अर्थसंकल्पात शिक्षणाबरोबरच रोजगार आणि कौशल्य विकास या विषयांची एकत्रित तरतूद केल्यामुळे फक्त शिक्षणासाठीची तरतूद नेमकी किती, याचा उलगडा



होऊ शकत नाही. नालंदा आणि तक्षशिला या परंपरागत भारतीय ज्ञानकेंद्राचा सतत उल्लेख करणाऱ्या राज्यकर्त्यांना अद्यापही त्या गतवैभवाच्या खुणांपासून काही शिकावेसे वाटत नाही. ज्ञानाच्या परंपरेत या देशाने जागतिक पातळीवर काही उच्च दर्जाचे काम करावे, असे जोवर सत्ताधाऱ्यांनाच वाटत नाही, तोवर शिक्षण हा विषय प्रत्येक अर्थसंकल्पात 'ऑप्शन'लाच टाकला जाणार.

हेही वाचा - लेख : काश्मीर भानावर कधी येणार?

शिक्षण व्यवस्थेत बदल सुचविणाऱ्या कोठारी आयोगाने १९६४ मध्ये सादर केलेल्या आपल्या अहवालात शिक्षणावर किमान सहा टक्के खर्च करण्याची अपेक्षा व्यक्त केली होती. ती पूर्ण होण्याची वाट पाहून चार दशके लोटल्यानंतर २०२० मध्ये सादर झालेल्या नव्या शैक्षणिक धोरणाच्या मसुद्यातही सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या सहा टक्के रक्कम शिक्षणावर खर्च करण्यात यावी, अशी सूचना करण्यात आली होती. परंतु त्याकडे साफ दुर्लक्ष करत याहीवेळी ही तरतूद आहे तेवढीच ठेवून, युवकांची जगातील सर्वात अधिक लोकसंख्या असलेल्या भारतातील कोट्यवधी युवकांच्या भविष्याचे मातेरे करण्याचा निर्णय या सरकारने घेतलेला दिसतो.

जपान, चीन, द. कोरियासारख्या देशांनी साठच्या दशकातच शिक्षणावरील खर्चात भरीव वाढ करून तेथील युवकांच्या भविष्याचा विचार कृतीत आणला होता. भारताला आजही त्या दिशेने पाऊल टाकण्याची गरज वाटत नाही, ही काळजीची गोष्ट आहे. बरे, जी काही शिक्षणव्यवस्था आजमितीस उपलब्ध आहे, तिचा दर्जा तरी ठीक असावा, तर तेही नाही. गेल्या दशकभरात सरकारने कौशल्य विकासाचे तुणतुणे वाजवत शेकडो कोटी रुपये खर्च केले. कौशल्ये आत्मसात करून रोजगाराच्या संधी मिळवण्याच्या या गोंडस कल्पनेने कागदावर बाळसे धरले असेलही. मात्र, जे युवक पदवी किंवा अशी कौशल्ये मिळवून रोजगाराच्या बाजारात उभे राहतात, त्यांच्यापैकी पन्नास टक्के युवकांकडे रोजगारक्षमता नसल्याचे निरीक्षण आर्थिक पाहणी अहवालातच नोंदवण्यात आले आहे.

जे काही शिक्षण मिळते, त्याने रोजगारही मिळणे दुरापास्त होणार असेल, तर उत्तम शिक्षणाच्या संधी भारताबाहेर शोधण्याशिवाय पर्याय राहात नाही. पाश्चात्य देशातील अशा उत्तम व्यवस्थांमध्ये शिक्षण घेतलेल्या युवकांनी मातृभूमीच्या प्रेमाखातर परत यायचे ठरवले, तरी त्यांना येथे अपेक्षित रोजगार संधी उपलब्ध नसते. परिणामी तेथेच स्थायिक होण्याकडे त्यांचा कल राहतो. जगातील कितीतरी देशांत असे भारतीय विद्यार्थी केवळ शिक्षणासाठी जातात. व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी भारतात पुरेशा विद्यार्थ्यांची सोय होत नाही. ती या देशांत शिष्यवृत्तीच्या सोयीसह उपलब्ध होते. त्यामुळे हे विद्यार्थी भारतात राहण्याचा पर्याय स्वीकारत नाहीत. दर्जेदार शिक्षण आणि त्या शिक्षणाचा उपयोग होईल, असा रोजगार या दोन्ही बाबींचा भारतात पुरेसा अभाव आहे. त्यामुळे नवे शैक्षणिक धोरण अंमलात येण्यासाठी आवश्यक असलेली आर्थिक तरतूद केली गेली नाही, तर हे धोरणही कागदावरच राहण्याची शक्यता अधिक.

जगातले अनेक विकसित देशही तेथील शिक्षणावर भारतापेक्षा कितीतरी अधिक प्रमाणात खर्च करतात. क्युबासारख्या देशातही शिक्षणावरील खर्च सुमारे बारा टक्के एवढा प्रचंड आहे. जगातील विकसित देश गेली अनेक दशके शिक्षण आणि संशोधन यावर मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करतात. त्या तुलनेने भारताची पीछेहाट दिसते. संसाधने आणि विकास या क्षेत्रात गुंतवणुकीची जागतिक सरासरी १.७ टक्के एवढी असताना, भारतात आजवर ती सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ०.७ टक्के एवढीच राहिली आहे आणि ती जगातील अन्य सर्व देशांपेक्षा सर्वात कमी आहे, असे निती आयोगाने केलेल्या पाहणीत आढळून आले आहे. याचा अर्थ शिक्षण, संशोधन या विषयांना प्राधान्य दिल्याशिवाय या देशाची प्रगती होणे केवळ अशक्य. अर्थसंकल्पात शिक्षणाची सांगड रोजगाराशी घालताना खासगी उद्योगांवरच मदार ठेवण्यात आली आहे. कौशल्य विकासावर एकीकडे भर द्यायचा आणि अशी कौशल्ये आत्मसात केल्यानंतरही रोजगाराच्या हमीची शाश्वती नाही, अशा परिस्थितीत या देशातील सर्वाधिक लोकसंख्या निराशेच्या वातावरणात राहील. केवळ उमेदवारी काळात विद्यावेतन (स्टायपेंड) देणे हे त्याचे उत्तर असू शकत नाही. असे वेतन कुणालाही कायमस्वरूपी मिळू शकत नाही. याचा अर्थ हीही एक प्रकारची खिरापतच. युनेस्कोच्या सांख्यिकी विभागाच्या माहितीनुसार भारतात दहा लाख लोकसंख्येमागे केवळ २५३ शास्त्रज्ञ वा संशोधक आहेत. ही संख्या विकसित देशांच्या तुलनेत खूपच कमी आहे. संशोधनासाठी खासगी उद्योग व संस्थांचे योगदान ४० टक्क्यांपेक्षा कमी आहे. विकसित देशातील हे प्रमाण सुमारे ७० टक्के आहे. या क्षेत्रात गुंतवणूक करणाऱ्या जगातील २५०० कंपन्यांच्या यादीमध्ये केवळ २६ भारतीय कंपन्यांचा समावेश आहे. अर्थसंकल्पात विद्यापीठ अनुदान आयोगासाठीच्या तरतुदीत भरीव कपात करताना, उच्च शिक्षणाबद्दलचा दृष्टिकोन सरकारने जाहीर करून टाकला आहे. आज युवकांची संख्या अधिक असणाऱ्या भारतातील ही स्थिती काही काळाने बदलणार आहे, हे लक्षात घेऊन आत्तापासूनच शिक्षणावरील खर्चात भरीव वाढ करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. मात्र त्याकडे याही अर्थसंकल्पात कानाडोळा करण्यात आला. बौद्धिक क्षमतांच्या बाबतीतही भारत अन्य देशांच्या तुलनेत मागे पडत चालला आहे. भारतीय विद्यार्थ्यांचा सरासरी बुद्ध्यांक ७७ असून देशाचा क्रमांक ९४ वा आहे, तर शेजारील चीनमधील बुद्ध्यांक १०४ असून तो देश पाचव्या क्रमांकावर आहे. ही स्थिती बदलायची तर त्यासाठी राजकीय दूरदृष्टी आणि शहाणपण हवे. जगातील अनेक देश ज्या क्षेत्राकडे अतिशय गांभीर्याने बघत असूनही आपण त्यापासून कोणताच धडा घेणार नसू, तर आपल्याएवढे करंटे आपणच. शिक्षणाच्या खर्चाचा बोजा परवडेनासा होत चालल्यामुळे खासगी संस्थांच्या हाती सारी व्यवस्था सोपवण्याने सरकारवरील भार कमी होईल कदाचित, मात्र त्यामुळे संशोधन आणि त्याचा रोजगार निर्मितीशी असलेला संबंध हळूहळू पुसट होत जाईल. परदेशात संशोधनासाठी उपलब्ध असलेल्या सुविधांच्या पातळीवर, भारत मागासलेला वाटावा, अशी स्थिती येण्यास आजवरची सर्व सरकारेच कारणीभूत आहेत. केवळ आदर्श वाटावीत, अशी धोरणे आखून काही उपयोग होत नाही. ती प्रत्यक्षात आणण्यासाठी संसाधने उभी करावी लागतात आणि त्यासाठी गुंतवणूक करावी लागते. आपण नेमके त्याच बाबतीत मागे पडत चाललो आहोत. जागतिक महासत्ता होण्याची स्वप्ने पाहायला हवीत, पण त्यासाठी मुळापासून प्रयत्नही करायला हवेत. मनातली इच्छा प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रचंड लोकसंख्या, अनेक भाषा समूह, विविध आर्थिक गट यांना सामावून घेणारी व्यवस्था निर्माण करणे हे फार मोठे आव्हान आहे. ते स्वीकारण्याची हिंमत न दाखवणे भारताला परवडणारे नाही. केवळ उत्तम व्यवस्था नसल्याने परदेशात शिकून स्थायिक झालेले कितीतरी भारतीय अनेक जागतिक संस्थांमध्ये भरीव कामगिरी करत आहेत, याचा अभिमान बाळगतानाच, ते या देशात परत का येऊ इच्छित नाहीत, याचाही विचार त्यासाठीच अत्यावश्यक ठरतो.

# पान एक वरून

**बीड पालिकेला शिवसंग्रामने ...**

उपस्थित होते.शहरातील नागरिकांच्या मूलभूत सुविधा आणि नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील समस्या जाणून घेऊन त्या समस्यांचे निराकरण करणे हे नगरपालिकेचे संविधानिक जबाबदारी असून बीड नगरपालिका यामध्ये सपशेल अपयशी ठरल्याचे दिसत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून बीड शहरातील नागरिकांना वेळेवर पाणी मिळत नाही. मोकाट जनावरे, कुत्रे व इतर प्राण्यांचा शहरात सर्रास वावर, घाणीचे सर्वत्र पसरलेले साम्राज्य, जागोजागी रस्त्यावरील खड्डे, नाल्यांची साफसफाई आणि अस्वच्छता आणि विविध भागातील रस्त्यांचा प्रश्न यामुळे बीड शहरातील जनता अक्षरशः त्रस्त झाली आहे. याकडे बीड नगर पालिकेचे कसलेही लक्ष नाही . या सगळ्या समस्या संदर्भात आज शिवसंग्रामचे शिष्ठ मंडळ निवेदन घुवून मुख्याधिकारी यांना निवेदन देण्यासाठी गेले होते. यावेळी डॉ. ज्योती मेटे या देखील थेट मुख्याधिकारी यांच्या दालनात आल्या आणि नागरिकांच्या समस्या त्यांनी मांडल्या यावेळी मुख्याधिकारी यांनी निवेदनात देलील्या समस्येवर महिन्या भरात काम करू आणि त्या सोडवण्याचा प्रयत्न करू असे आश्वासन दिले.

**विनेश फोगटने घडवला...**

संधी दिली नाही आणि एकतर्फी विजय मिळवला. विनेश फोगटने उपांत्यपूर्व फेरीत उत्कंठावर्धक लढतीत युक्रेनच्या ओसाना लिवाचचा ७-५ असा पराभव केला. याशिवाय पहिल्या सामन्यात तिने जपानच्या युई सुसाकीचा ३-२ असा पराभव केला. चार वेळा विश्वविजेत्या सुसाकीने टोकियो ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकले होते. विनेशने ऑलिम्पिक वगळता प्रत्येक मोठ्या खेळात पदके मिळवली आहेत. यामध्ये कॉमनवेल्थ गेम्समध्ये एक सुवर्ण, एक आशियाई स्पर्धेतील विजेतेपद, वर्ल्ड चॅम्पियनशिपमधील दोन कांस्यांसह आशियाई चॅम्पियनशिपमधील आठ पदकांचा समावेश आहे. मात्र, तिला रिओ आणि टोकियो ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकता आले नाही. विनेश फोगट, हिने गेल्या वर्षी मॅटपासून बराच काळ दूर होती आणि भारताचे माजी कुस्ती महासंघाचे प्रमुख ब्रिजभूषण सिंग शरण यांच्यावर लैंगिक गैरवर्तनाचा आरोप केल्यानंतर त्यांच्या विरोधात आंदोलन केले.

**परळी रेल्वे प्रश्नांवर रेल्वेमंत्र्यांना...**

वेळ आली आहे त्यावर रेल्वे प्रश्न असणारी रेल्वे पटरी च्या वस्ती विरहित असलेल्या बाजूने जमीन अधिग्रहण करून रेल्वेच्या दुहेरीकरणाचे काम करावे. पूर्वी परळी ते मुंबई अशी धावणारी गाडी आता लातूर ते मुंबई अशी धावते लातूर रेल्वे स्थानकावर मुक्कामावर असते तो मुक्काम न करता ती रेल्वे पूर्वी चालू असलेली परळी मुंबई रेल्वे गाडी पूर्वत करावी, घाटनांदुर येथील रेल्वे स्टेशन वरून धावणाऱ्या सर्व रेल्वेना थांबा द्यावा यासह रेल्वे संबंधीत विषयावर सखोल चर्चा होऊन निवेदन देण्यात आले. चर्चेदरम्यान काँग्रेस शिस्तमंडळाने सांगितले की, रेल्वेमंत्र्यांनी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांना तुम्ही शब्द दिला त्याच दिवशी राजपत्रित निघालेल्या नोटीसीचे पेपरच्या माध्यमातून प्रसारित करण्यात आले होते. यामुळे पुन्हा एकदा धक्का बसला आहे.यावर रेल्वेमंत्री यांनी सांगितले की याबाबत लवकरच निर्णय घेऊ असे काँग्रेसचे मंडळाला आश्वासित केले.रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना भेटलेल्या शिष्टमंडळात खासदार रजनीताई पाटील बीड जिल्ह्याचे बीड जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख परळी शहराध्यक्ष बहादूरभाई, अमर शिंदे अल्पसंख्यांक शहर अध्यक्ष रसूल खान प्रवक्ते बद्दर भाई, व अबूतला इत्यादी काँग्रेस पदाधिकारी कार्यकर्ते सहभागी होते.

**नाथसागर हायड्रो केंद्रातील...**

अधिकृत असल्याचे समजते.शासनाने जलविद्युत केंद्र कायमस्वरूपी चालू राहावे हाच उद्दिष्ट ठेवून हे युनिट चालू केले,ते बंद होण्यासाठी नाही. याचा विसर मात्र संबंधित अधिकाऱ्यांना पडल्याचे दिसून येते. यावरून हे विद्युत केंद्र सुरू होऊ शकत नाही असे त्यांच्या वर्तनाचा अनुभव येत असल्याचे दिसून येत आहेत.याची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गंभीर दखल घेऊन हायड्रो सुरू करण्यासंदर्भात अडीअडचणी सोडवण्यासाठी केंद्र सुरू करण्यासाठी बैठक घेण्याची काळाची गरज आहे. नसता एक चांगल्या हायड्रो युनिट बंद होण्याच्या मार्गाकडे वाटचाली समोर येत आहे. जपानी असलेले हे युनिट महाराष्ट्र शासनाचा एकमेव चांगल्या प्रकारचा विद्युत निर्मिती करणारा प्रकल्प आहे.त्यावेळच्या सरकारमधील मंत्र्यांनी, अधिकाऱ्यांनी मोठ्या प्रयत्नांनी हा प्रकल्प यशस्वी रित्या चालवला आहे.पण सध्यास्थितीत संबंधित अधिकाऱ्यांच्या वर्तनामुळे हायड्रोचे तीन तेरा वाजले आहेत. शासनाने जपानमधील हे युनिट सुरू करण्यासंदर्भातील तज्ञांना बोलावून भारताने तांत्रिक कामगिरीत मजल मारली आहे .त्याही तांत्रिक तज्ञांची तथा अभ्यासकांची मदत महाराष्ट्रातील एक दुर्मिळ असलेला हा प्रकल्प सुरू करण्यासाठी शर्तीचे प्रयत्न करण्याची गरज आहे.या जलविद्युत केंद्रातून पात्रात पाणी सोडून व तेच पाणी परत नाथसागरात घेऊन वीजनिर्मिती करणारे केंद्र आहे. हे केंद्र सुरू करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने अति तात्काळ हालचाली कराव्यात अशी जनतेची मागणी आहे.महाराष्ट्र शासनाचा उद्देश हे जल केंद्र सातत्याने पूर्णवेळ कार्यरत राहील हा उद्देश ठेवूनच हे जलविद्युत केंद्र उभे करण्यात आले.परंतु हे जलविद्युत केंद्र सुरू करण्यासाठी वीज निर्मिती व वीज वितरण प्रशासनाने गेल्या अनेक वर्षांपासून हे विद्युत केंद्र पूर्णतः पूर्ण क्षमतेने सुरू करण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले नाहीत.त्यामुळे या विद्युत केंद्रापासून शासनाला जो आर्थिक फायदा होत होता व होणार आहे त्यासाठी स्थानिक जलसंपदा विभाग व जल वितरण हायड्रो विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांसह वरिष्ठांनी ही वेळीच लक्ष न घातल्यामुळे शासनाचे कोट्यावधी रुपयांची नुकसान होत आहे.

**बीडमध्ये मुख्याध्यापक उतरले ...**

०१ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना जुनी पेंशन योजना लागु करावी या मागण्यांचे निवेदन देण्यात आले. या आंदोलनात मुख्याध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष पैठणे सर, सचिव विष्णुपंत रसाळ सर, संस्था प्रतिनिधी संघटने प्रतिनिधी सुशीलाताई मोराळे मॅडम, जितेंद्र डोंगरे सर, मराठवाडा शिक्षक संघाचे राजकुमार कदम सर, डी. जी. तांदळे सर, जिल्हाध्यक्ष कालिदास धपाटे सर, गणेश आजबे सर, शिक्षकेतर संघटनेचे श्री कळबंकर सर, युक्रांचे पंडित तुपे सर, डिंगांबर पांचाळ सर,लक्ष्मण इंगोले सर, अनिल काळे सर, प्रदीप गाडे सर, गणेश घोडके सर, रमेश बागलाने सर, सुशीलकुमार गायकवाड सर, कानडे सर, भीमराव सावंत सर, रामहरी कदम सर, सुराज्य शिक्षक संघटनेचे पदाधिकारी दत्तात्रय चव्हाण सर, काजळे सर, विनाअनुदानित शाळा कृती समितीचे जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ सर, भागवत यादव सर, सुरेश कदम सर, प्रकाश कदम सर, गणेश गुजर, सय्यद सर, पि के कदम सर, एम पी शिरसाट सर, पांचाळ सर, सावंत सर, फपाळ सर, डोंगरदिवे सर, हाके सर, गरड सर, मेहेत्रे सर, वक्ते सर, मंदे सर, शर्मा सर, यांच्यासह विविध शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते

**सोनपेठ तालुक्यात अवैध...**

वाढत आहे दारूमुळे गावात भांडण तंटे वाढत आहेत दररोज एक ना एक भानगडी गावात होत असल्याने शांततेचा भंग होत आहे गावात अनेक राजकीय मोठमोठी पुढारी आहेत परंतु अद्याप गावात चालत असलेली देशी दारू बंद करण्यासाठी धजावले नाहीत.ग्रामीण भागातील अवैध दारू विक्रीबाबत जिल्हाधिकारी साहेबांना आदेश द्यावा लागेल का?एवढे निर्ढावलेले पोलिस प्रशासन कुण्याच्या दबावाखाली आहेत? असे प्रश्न सामान्य नागरिकांना पडले आहेत. महामार्गावरील ढाब्यावर सर्रासपणे अवैध दारू विकली जाते. पोलिस प्रशासन नेमकी कारवाई करण्यास का धजावत नाही की यामागे काही धागेदोरे आहेत याचा तपास एसपी साहेबांनी करावा.यात पीआय आणि एसपी यांनी जातीने लक्ष घालावे.अशी नागरिकांकडून मागणी होत आहे.तर आता जिल्हाधिकारी आणि एसपी साहेब यांच्यावर अवैध दारू विक्री बाबतीत आदेश मिळतील अशी सामान्य नागरिकांना आशा आहे.

# लिफ्ट मागितली खरी पण घडले भलतेच!

## सतर्कता : महिलेने मारली धावत्या दुचाकीवरुन उडी

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव बस स्थानकावरून शहरातील आमखेडा भागाकडे जाण्यासाठी दुचाकी स्वराला लिफ्ट मागून महिलेने थांब म्हटल्यावर ही दुचाकी स्वार न थांबल्या मुळे भेदरलेल्या महिलेने भरधाव दुचाकी वरून उडी मारल्याची घटना शहरा जवळील वीज उपकेंद्राजवळ सायंकाळी सात वाजेच्या सुमारास घडली या घटनेत महिला गंभीर जखमी झाली आहे तिला तातडीने उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथे रात्री दहा वाजता हलविण्यात आले आहे

सुनीता बाळू भोळणकर(रा मुक्ताईनगर जि जळगाव वय ३५) असे उडी मारलेल्या जखमी महिलेचे नाव आहे ही महिला मुक्ताईनगर वरून नातेवाईकाकडे सोयगाव ला आली होती तिला शहरापासून काही अंतर जाण्यासाठी तिने सोयगाव बस स्थानकावरून नांदगाव तांड्याकडे जाणाऱ्या दुचाकी क्र-एम एच-१९ डी इ २७७१ तिच्या अनोळखी असलेल्या पप्पू राठोड( वय २५) रा नांदगाव तांडा ता सोयगाव याला हात देऊन लिफ्ट मागितली मात्र दुचाकी स्वराला महिलेने थांब म्हटल्या वरही तो न थांबल्या मुळे तिने भरधाव दुचाकी वरून उडी घेतली यामध्ये ती गंभीर जखमी झाली घटनेची माहिती मिळताच सोयगाव पोलीस ठाण्याचे जमादार राजू बर्डे रवींद्र तायडे अजय कोळी गजानन दांडगे आदींनी घटनास्थळी धाव घेवून स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने सोयगाव ग्रामीण रुग्णालयात दाखल केले.

प्राथमिक उपचार करून तिला पुढील उपचार साठी जळगावला सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले त्यानंतर मात्र तिची प्रकृती गंभीर झाल्या मुळे त्या महिलेला तातडीने उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथे रात्री दहा वाजता हलविण्यात आले आहे घटनेची सोयगाव पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे दुचाकी सोयगाव पोलीस ठाण्यात जप्त करण्यात आली आहे

# पान सह वरून

**कंकालेश्वर विद्यालयात लेखन**

पंकज कुटे, आकाश जगताप, प्रतिक कांबळे आणि गौरव वायभट यांनी शाळेचे मुख्याध्यापक अंबादास शेकडे, संदीप जाधवर, शिवाजी जाधवर, वीरेंद्र जाधव, सुरेश पतंगे आणि राम मोराळे यांच्याकडे सहा लेखन फलक (व्हाईट बोर्ड) सुपूर्त केले. याप्रसंगी कंकालेश्वर विद्यालयातील मुख्याध्यापक व शिक्षकवृंद यांनी अनिलदादा जगताप यांचे आभार मानले.

**आरोग्य क्षेत्रात मिळविली शासकीय**

प्रतिनिधी म्हणून त्यांचे पती ज्ञानेश्वर परमेश्वर सोळंके यांचा सत्कार करण्यात आला आहे. केज येथील सक्रिय पत्रकार भवनामध्ये केज विधानसभा मतदार संघाचे

**जमिनीच्या मोजणीसाठी**

मात्र प्रशासनाने त्यांच्या उपोषणाची दखल घेतली नसल्याचे गि-हे यांचे म्हणणे आहे. आपल्या उपोषणाची प्रशासनाने दखल न घेतल्यास उद्यापासून आपण पाणी देखील ग्रहण करणार नसल्याचे त्यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. याबाबत राज्याचे मुख्यमंत्री, महसूल मंत्री, जिल्हाधिकारी, तहसीलदारांसह पोलीस निरीक्षकांना निवेदन देण्यात आलेले आहे.

**...तरच समाजात सन्मान**

उच्चशिक्षित व स्वतःच्या पायावर उभी राहिलीतर कुटूंबासह सर्वत्र सन्मान मिळत असतो.अनेक मुलींना शिक्षणाची संधी मिळत नाही, ज्यांना संधी मिळते त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले पाहिजे. तर प्रा डॉ विनोद जगतकर व प्रा प्रसाद देशमुख यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा फुटके यांनी तर सुत्रसंचालन अंजली धायगुडे, आभार तनूराणी गित्ते हिने मानले. यावेळी महाविद्यालयातील प्रा.विशाल पौळ, प्रा आशिलता शिंदे, प्रा विणा पारेकर, प्रा प्रविण नव्हाडे, प्रा अशोक पवार यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स ॲन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi news paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# पोलीस ठाण्याची इमारत धूळखात पडून

## बोंबला : उदघाटनासाठी काही मुहूर्त मिळेना

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

पाच कोटी नऊ लक्ष रु खर्चून उभारण्यात आलेल्या सोयगाव पोलीस ठाण्याचे इमारत उदघाटनचा मुहूर्त मिळत नसल्याने धूळखात पडून आहे लोकसभा निवडणुकीच्या आचार संहितेत या पोलीस ठाण्याच्या इमारती चे उदघाटन अडकले होते मात्र त्यानंतर अद्यापही मुहूर्त मिळाला नसल्याने ही वास्तू उभीच आहे.

शासनाने सोयगावला तालुका पोलीस ठाणे व्हावे यासाठी पाच कोटी नऊ लक्ष रु मंजूर केले होते या इमारतीचे भूमिपूजन ही झाले त्यानंतर इमारत उभी राहून चार महिने झाले तरीही अद्याप या इमारतीच्या उदघाटन चा मुहूर्त मिळाला नाही त्यामुळे सोयगाव पोलीस ठाण्याची नवीन इमारत कुलूपबंद स्थितीत आहे.




सोयगाव पोलीस ठाण्यासाठी शहरातील बाजार पट्टा भागात भाड्याच्या खोलीत गेल्या चाळीस वर्षा पासून सोयगाव पोलीस ठाण्याचे कामकाज सुरू आहे इमारत ऊभी राहुनही चार महिन्यापासून सोयगाव पोलीस ठाणे अद्यापही भाड्याच्या खोलीत सुरु आहे त्यामुळे नवीन वास्तु धूळखात पडून आहे शहरवासीयांमध्ये या नवीन इमारती च्या उदघाटनाची प्रतीक्षा लागून आहे.

### पोलीस वसाहती चा प्रस्ताव धूळखात

सोयगाव पोलीस ठाण्याचे इमारती सह पोलीस निवासस्थानाचा प्रस्तावही मंजुरी साठी पाठविण्यात आला होता मात्र मंजूरी अभावी निवास स्थानचा प्रस्ताव शासन दरबारी धूळखात पडून आहे

# डॉ.फुलचंद सलामपुरे यांचा गौरव



सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

माजी व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.फुलचंद भगीरथ सलामपुरे यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात बुधवारी गौरव सोहळा आयोजित करण्यात आला.

डॉ सलामपुरे हे ३० वर्षांच्या सेवेनंतर ३१ जुलै रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. यानिमित्ताने प्राचार्य डॉ शिरीष पवार यांच्या अध्यक्षतेखाली बुधवरी हा कार्यक्रम झाला. यावेळी डॉ सलामपुरे व वसंतीबाई सलामपुरे यांचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. विद्यापीठाच्या विद्यार्थी संसदेचे माजी अध्यक्ष, अधिसभा, व्यवस्थापन परिषद सदस्य म्हणून त्यांनी कार्य केले. तसेच १९८६ मध्ये अखिल भारतीय विद्यापीठ कुस्ती स्पर्धेत त्यांनी सुवर्णपदक पटकाविले होते. गेली ३० वर्षे त्यांनी पंडित नेहरु महाविद्यालय व संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात अध्यापन कार्य केले. यावेळी प्राचार्य शिरीष पवार, उपप्राचार्य रावसाहेब बारोटे, डॉ दिलीप बिरुटे ,प्रा.शिरीकृष्ण परिहार, प्रा.शत्रूघन भोरे, प्रा.उल्हास पाटील,कार्यालयीन अधीक्षक साबळे, लक्ष्मण साळोक, प्राचार्य मधुकर चाटसे, डॉ कांबळे दयानंद,प्रा,संजय बिरंगणे,अमृत बिराडे, ॲड.सारंग देशमुख यांच्यासह संत ज्ञानेश्वर महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# लोकसभेपासून बदलले राजकीय समीकरण !

## पडघम : डॉ.अंजली घाडगे होतील आमदार

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्यात सध्या चालू असलेल्या मराठा आरक्षणामुळे राजकीय समीकरणे बदललेली आहेत. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत मराठवाड्यात तर ते प्रकर्षाने जाणवले आहे. लोकसभा निवडणुकीत मराठा मुस्लिम बौद्ध विजय असे वातावरण निर्माण झालेले होते. यामुळे बीड सह मराठवाड्यात तसे निकाल देखील लागलेले आहेत आणि सध्याही ती परिस्थिती काहीही बदललेली नाही. तेच समिकरण सध्या देखील आहे. यामुळे केज विधानसभा मतदारसंघात देखील या विधानसभा निवडणुकीत मराठा मुस्लिम आणि बौद्ध हे एकत्रित होऊन सक्षम उमेदवार पुढे आणतील व आमदारकीची माळ त्याच्याच गळ्यात घालतील असीच राजकीय परिस्थिती आहे. केज विधानसभा मतदारसंघ हा अनेक वर्षांपासून राखीव असल्याने या निवडणुकीत माजी मंत्री स्व विमलताई मुंदडा आणि पृथ्वीराज साठे, संगिता ठोंबरे, नमिता मुंदडा यांचे माध्यमातून चर्मकार आणि मातंग समाजाला प्रतिनिधित्व मिळालेले आहे, परंतु राखीव प्रवर्गातील बौद्ध समाज मोठ्या संख्येने असताना देखील या समाजाला प्रतिनिधित्व मिळाले नाही. यावेळी मात्र आता ही परिस्थिती बदललेली आहे. मराठा, मुस्लिम आणि बौद्ध हे एक झालेले आहेत म्हणून आता चर्मकार किंवा मातंग समाजापेक्षा बौद्ध समाजातील उमेदवार चांगल्या पक्षाकडून आल्यास तोच विजयी होणार आहे. केज विधानसभा मतदारसंघाची या निवडणुकीनंतर पुनर्रचना होईल आणि हा मतदारसंघ त्यानंतर म्हणजे पुढील पंचवार्षिक निवडणुकीत सर्वांसाठी खुला होईल. यामुळे ज्या प्रवर्गासाठी हा मतदारसंघ राखीव सुटला होता त्या मतदारसंघातील मोठ्या संख्येने असलेल्या बौद्ध समाजासाठी हि शेवटची संधी असणार आहे. ती संधी यावेळी या समाजाला देऊन आरक्षणाचा गोड समारोप यावेळी होईल असे वाटते. मराठा मुस्लिम बौद्ध हे एकदिलाने लोकसभा निवडणुकीत सोबत राहिले आणि विजयश्री खेचून आणली आहे. तीच परिस्थिती आता या विधानसभा निवडणुकीत पहायला मिळणार आहे हे निश्चित आहे. मग केज मतदारसंघात बौद्ध समाजातून कोणाला यावेळी संधी मिळू शकते तर त्यामध्ये उच्च शिक्षीत असलेल्या डॉ अंजली घाडगे यांच्या नावाची चर्चा होत आहे. केज मधील घाडगे कुटुंब म्हणजे उच्च शिक्षीत आणि उच्च विचारसरणी असलेलं कुटुंब, डॉ अंजली घाडगे या उच्च शिक्षीत असल्याने सर्वसामान्य लोकांच्या मदतीसाठी कार्य करण्याची त्यांना मोठी आवड आहे. या मतदारसंघातील सर्वसामान्य लोकांच्या त्या नेहमीच संपर्कात असतात. यावेळी बदललेल्या या राजकीय समीकरणामुळे लोकांच्या मनात त्यांनाच संधी देण्याचा निर्धार असल्याचे चर्चेत आहे. त्यांचे वडील रामराव घाडगे गुरूजी म्हणजे सर्वांचेच लाडके व्यक्तिमत्त्व होते. त्यांचा मोठा जनसंपर्क या मतदारसंघात होता आणि म्हणून या निवडणुकीत त्यांच्या या लाडक्या मुलीला आमदार करुन मतदारसंघातील लोक त्यांना श्रद्धांजली अर्पण करतील असे वाटते. डॉ अंजली घाडगे यांनी मतदारसंघात दौरे सुरू केले आहेत. केज अंबेजोगाई शहरासह ग्रामीण भागातील नेकनुर आणि काही मोठ्या काही छोट्या गावांमध्ये जाऊन त्यांनी जनतेशी संवाद साधला आहे तर लोकांनी त्यांना भरभरून असा प्रतिसाद दिलेला दिसत आहे. आपण ही निवडणूक लढवणारच असल्याचे त्यांनी सांगितले आहे. मराठा मुस्लिम आणि बौद्ध समाजाला अपेक्षित असलेला असा हा उमेदवार या निवडणुकीत विजयी होणारच आहे. या निवडणुकीत आता डॉ अंजली घाडगे याच बाजी मारणार आहेत असी चर्चा होताना पहायला मिळत आहे.



# बाबासाहेबांना अपेक्षित शैक्षणिक उपक्रम

## रानबा गायकवाड : परळीत एक वही एक पेन अभियान!

परळी/पुण्यभूमीप्रतिनिधी

शहरातील वडसावित्री भागात असणाऱ्या नागनाथ निवासी विद्यालयात एक वही एक पेन अभियान अंतर्गत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. याप्रसंगी विद्यालयातील सर्व विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना मान्यवरांच्या हस्ते साहित्य वाटप करण्यात आले. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असा हा सामाजिक उपक्रम असल्याचे यावेळी जेष्ठ पत्रकार व साहित्यक गायकवाड यांनी सांगितले.



महामानव, विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंती निमित्ताने १४ एप्रिल रोजी पत्रकार विकास वाघमारे व विकास रोडे यांच्या संकल्पनेतून बाबासाहेबांना अपेक्षित एक वही एक पेन या अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. या अभियानांतर्गत जमा झालेले साहित्य आज दिनांक ६ ऑगस्ट रोजी नागनाथ निवासी विद्यालयात वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार संजय खाकरे, संपादक ज्ञानोबा सुरवसे, सामाजिक कार्यकर्ते अश्विन मोगरकर, सामाजिक कार्यकर्ते अनंत इंगळे, पत्रकार धनंजय आढाव, नवनाथ दाने ,पत्रकार संभाजी मुंडे ,धीरज जंगले, विष्णू मुंडे, हरिभाऊ बुरकुले, इंजिनीयर प्रशांत रोडे, विकास चोपडे, विनायक काळे, विद्याधर शिरसाठ आदी उपस्थित होते.

याप्रसंगी रानबा गायकवाड, संजय ठाकरे, अनंत इंगळे, अश्विन मोगरकर, विष्णू मुंडे , नवनाथ दाणे आदींनी आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रानबा गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन इंगळे सर यांनी तर आभार चव्हाण यांनी केले. या कार्यक्रमास शाळेचे माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक होळंबे, प्राथमिकचे डी.बी. मुंडे, तसेच सातभाई मॅडम, शिक्षक संजय फड, अनंत मुंडे, नागरगोजे ,राजभोज, मोती, कराड, धेरे, हरिदास, शिरसाठ मॅडम, व खाडे मॅडम यांच्यासह विद्यार्थी, विद्यार्थिनी शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# अपघातात पती-पत्नी गंभीर जखमी!

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

धारूर रोडवरील नेहरकर पेट्रोल पंपाच्या समोर अज्ञात वाहनाने दुचाकी ला दिलेल्या धडकेमध्ये दुचाकी वरील पती - पत्नी गंभीर जखमी झाल्याची घटना रविवारी रात्री साडे दहा ते अकराच्या दरम्यान घडली. धारूर तालुक्यातील आवरगाव येथील घनश्याम ऋतू पद्म शिंदे वय ४० हे आणि त्यांच्या पत्नी हे केज कडून धारूर कडे रात्री साडेदहा ते अकराच्या दरम्यान निघाले होते.दरम्यान भवानी मंदिराच्या थोडेसे पुढे गेल्यानंतर एका पेट्रोल पंपाच्या समोर अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. यामध्ये घनश्याम शिंदे यांच्या पायाला, डोक्याला गंभीर इजा झाली असून त्यांच्या पत्नीही जखमी झाल्या आहेत. सदरील अपघाताची माहिती मिळताच १०८ ची रुग्णवाहिका त्या ठिकाणी तात्काळ पोहोचली आणि जखमींना उपचारार्थ हलवण्यात आले. सध्या त्यांच्यावर लातूर येथील एका खाजगी हॉस्पिटलमध्ये उपचार सुरु आहेत.

# दिव्यांगाना अंत्योदय शिधापत्रिका वाटप



सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव तहसील कार्यालयात बुधवारी महसूल पंधरवडा निमित्ताने एक हात मदतीचा दिव्यांगांच्या कल्याणाचा योजनेमार्फत पाच दिव्यांग लाभार्थ्यांना अंत्योदय शिधापत्रिकावाटप करण्यात आले

तहसीलदार मनीषा मेने जोगदंड यांच्या हस्ते या शिधापत्रिकाचे वितरण करण्यात आले यावेळी नायब तहसीलदार गोरखनाथ सुरे पुरवठा अधिकारी नाना मोरे आदिंसह दिव्यांगा ची उपस्थिती होती दरम्यान महसूल पंधरवडा निमित्ताने बुधवारी एक हात मदतीचा दिव्यांगांच्या कल्याणाचा हा उपक्रम राबविण्यात आला यावेळी दिपक फुसे शिपाई अनिल पवार संजय नांवकर संतोष नवगैरे आदींनी पुढाकार घेतला होता.

# महिलांनी समस्यांवर निर्भीडपणे व्यक्त व्हावे

## शर्मिष्ठा भोसले : बलभीम महाविद्यालयात मार्गदर्शन

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

आज एकविसाव्या शतकात आपण वावरत आहोत. महिलांनी परंपरागत रूढी, परंपरा, प्रथा झुगारून दिल्या पाहिजेत व स्वतः स्वावलंबी बनून आत्मसन्मानाने आपले जीवन जगले पाहिजे तसेच आपल्या समस्या निर्भीडपणे मांडल्या पाहिजेत असे प्रतिपादन पुणे येथील मुक्त पत्रकार तथा सुप्रसिद्ध लेखिका व कवयित्री मा. शर्मिष्ठा भोसले यांनी केले.



बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात दि. ६ ऑगस्ट रोजी मराठी विभाग व महिला कक्ष यांच्या वतीने 'महिलांचे प्रश्न-गटचर्चा' या विषयावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी त्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रो. डॉ. बाबासाहेब कोकाटे होते तर मंचावर मराठी विभागप्रमुख प्रो. डॉ. मनोहर सिरसाट, महिला कक्ष समन्वयक डॉ. किर्ती देसाई यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना शर्मिष्ठा भोसले म्हणाल्या की, ग्रामीण भागातील विद्यार्थीनींनी आपल्याला भेडसावत असणाऱ्या सामाजिक, शैक्षणिक समस्या सांगितल्या पाहिजेत. विद्यार्थीनींनी न घाबरता स्वावलंबी जगले पाहिजे यासाठी शिक्षण घेतले पाहिजे.

याप्रसंगी विद्यार्थीनींनी आपल्या समस्या व प्रश्न मांडले या प्रश्नांचे शर्मिष्ठा भोसले यांनी निरसन केले. आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात उपप्राचार्य डॉ.बाबासाहेब कोकाटे म्हणाले की, महिलांना अनेक प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागते. महिलांनी या समस्यांवर मात करून शिक्षण घेतले पाहिजे.तत्पुर्वी मराठी विभागप्रमुख प्रो.डॉ. मनोहर सिरसाट यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रम आयोजनामागील भूमिका मांडली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संदीप परदेशी यांनी केले तर आभार डॉ. किर्ती देसाई यांनी मानले.

या कार्यक्रमास प्रा. महारूद्र जगताप, डॉ. सुचिता खामकर यांच्यासह महाविद्यालयातील महिला प्राध्यापिका व विद्यार्थीनींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## ॲड.नारायण गोले :उपविभागीय कार्यालयासमोर धरणे आंदोलन

# उध्वस्त करणाऱ्या सरकारला जाब विचारा

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेल्या दहा वर्षात शेतकरी पूर्णता नागवला असताना शासन शेतकऱ्याचे कर्जमाफी करू शकलेले नाही तसेच २०२० व २३-२४ सालचा पिक विमा अद्याप शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेला नाही, सर्वात महत्त्वाचा आणि जिव्हाळ्याचा म्हणजे शेतकऱ्याच्या शेतमालाला किपायात शिर हमीभावाचा प्रश्न अनेक दशकापासून प्रलंबित असून त्याकडे राज्यकर्त्याचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असून शेतकऱ्याला उध्वस्त करणाऱ्या सरकारला जॉब विचारण्यासाठी ०९ ऑगस्ट रोजी उपविभागीय कार्यालयासमोर होत असलेल्या धरणे आंदोलनात सहभागी व्हा असे आवाहन शेतकरी कामगार पक्षाचे नेते शेतकरी कामगार पक्षाचे राज्य मध्यवर्ती समिती सदस्य भाई ड नारायण गोले पाटील यांनी मंगरूळ नं.१ सावरगाव, फुले पिंपळगाव, हरकी निमगाव येथे शेतकऱ्यांशी संवाद साधताना केले.



शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने माजलगाव मतदार संघात शेतकरी संवाद दौरा सुरू असुन या मध्येशेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी झालीच पाहिजे, पिक विमा शेतकऱ्यांना तात्काळ मिळालाच पाहिजे, उसाचे गेल्या दोन वर्षाचे राहिलेले पैसे तात्काळ शेतकऱ्यांचा खात्यात जमा झाले पाहीजे.. पि एम किसान यौजने पासुन वंचित शेतकर्यांचा सदर यौजनेत तत्काळ समावेश केला पाहीजे..शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारीत हमी भाव दिला पाहिजे.बि-बियाणांच्या व खतांच्या वाढत्या किमती तात्काळ कमी झाले पाहिजे..माजलगाव तालुक्यातील सर्वच पांदन रस्त्याचे मुरुम- खडीकरण झाले पाहिजे.. लोकनेते कारखान्याने शेवटच्या ११दिवसाच्या काळातील गाळप केलेल्या ऊसाचे बिल तात्काळ अदा झाले पाहिजे सह अनेक प्रश्नांसाठी शेतकरी कामगार पक्षाच्या राज्य मध्यवर्ती समितीचे सदस्य भाई ड.नारायण गोले पाटिल, यांनी दि.०५ऑगस्ट रोजी सावरगाव,फुले पिंपळगाव,हरकी निमगाव,मंगरुळ नंबर १ येथे शेतकऱ्याला उध्वस्त करणाऱ्या सरकारला जॉब विचारण्यासाठी ०९ ऑगस्ट रोजी उपविभागीय कार्यालयासमोर होत असलेल्या धरणे आंदोलनात सहभागी व्हा असे आवाहन शेतकरी कामगार पक्षाचे नेते, शेतकरी कामगार पक्षाचे राज्य मध्यवर्ती समिती सदस्य भाई ड नारायण गोले पाटील यांनी मंगरूळ नं.१ सावरगाव, फुले पिंपळगाव, हरकी निमगाव येथे शेतकऱ्यांशी संवाद साधताना केले.

# मराठा कृती गटाने घेतली भेट



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

आज दिनांक ४ /८/२०२४ या दिवशी मराठा समाजाचे दैवत आदरणीय जरांगे पाटील यांना सदिच्छा भेट देण्यासाठी राष्ट्रमाता जिजाऊ समाज प्रबोधक मंडळ बीड महिला मराठा कृती गटातील महिला सुमन खाडे,मनीषा जगताप, कावेरी कुराणे, मनीषा उगले, ललिता भोसले, कल्पना रसाळ,शर्मिला शेळक(पत्रकार), काळकुटे ताई या सर्व महिला भगिनींनी जरागे पाटलांना भेट देऊन त्यांना आता उपोषण नको असी विनंती केली.समाजातील मुलांना शैक्षणिक सवलती बाबत चर्चा केली. त्याचबरोबर त्यांच्या घराची पाहणी करत असताना असे लक्षात आले की जरांगे पाटील यांचा वैभव म्हणजे फक्त माणुसकी,घरात चार भांड्याकुंडे शिवाय काही दिसले नाही, भेटवस्तूमध्ये मात्र छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळे आणि प्रतिमा एवढेच काय ते, तसेच जेव्हा आदरणीय जरांगे वहिनींची भेट घेतली तेव्हा त्यांच्या डोळ्यात पाणी होते आणि आनंदही होता. पती बद्दल लोकांच्या भावना त्यामुळे त्यांचा अभिमानाने उर भरून येत होते. सर्व महिलांना देखील त्या ठिकाणी गहरून आले होते याप्रसंगी विविध जिल्ह्यातून आलेले बंधू आणि भगिनी यांची देखील भेट घेऊन पुढील दिशा बाबत संवाद साधला.

# परदेशी पर्यटकांसाठी पूरक प्रकल्प रत्नागिरीत

## मिनी आर्ट गॅलरीच्या माध्यमातून १५ ऑगस्टला उद्घाटन - पालकमंत्री उदय सामंत; रत्नागिरीतील प्राणी संग्रहालयात आणणार पेंग्विन

**रत्नागिरी**

रत्नागिरीत विकासाच्या आणि पर्यटनच्यादृष्टीने काय काय आहे याचे मिनी आर्ट गॅलरीच्या माध्यमातून १५ ऑगस्टला उद्घाटन करण्यात येणार आहे. परदेशी पर्यटकांसाठी पूरक प्रकल्प रत्नागिरीत सुरू करण्यावर भर आहे. राणीच्या बागेनंतर आता रत्नागिरीतील प्राणी संग्रहालयात पेंग्विन असेल, असे प्रतिपादन पालकमंत्री उदय सामंत यांनी केले.

रत्नागिरी शहरातील प्रभाग २ येथील सभेप्रसंगी पालकमंत्री उदय सामंत बोलत होते. पालकमंत्री सामंत म्हणाले, रत्नागिरी तालुक्यातील ग्रामीण भागातील जनतेचे प्रश्न मार्गी लावण्याचे काम केले आहे; मात्र विकास करताना रत्नागिरी शहरालाही तेवढेच प्राधान्य दिले आहे. काही दिवसात महाराष्ट्राच्या नकाशात रत्नागिरीचे नाव उजळताना दिसेल. या प्रभागातील माजी नगरसेवक स्मितल पावसकर आणि निमेश नायर यांच्या तिकिटाचा नक्कीच विचार केला जाईल; मात्र माझी निवडणूक त्यांच्या अगोदर आहे त्यामुळे भरघोस मते या प्रभागातील नागरिक देतील, असा विश्वास आहे. राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या महायुती सरकारने विविध योजना आणल्या. त्याचा लाभ सगळ्यांनी घ्यावा. लोकसभेच्या निवडणुकीत खोटा प्रचार करून मुस्लीम आणि दलित बांधवांना भडकवण्यात आले. त्यामुळे विरोधात मतदान झाले. जोपर्यंत सूर्य आणि चंद्र आहे तोपर्यंत देशाचे संविधान बदलले जाणार नाही. कोणत्याही समाजाला देशाच्या बाहेर काढले जाणार नाही. जातीपातीच्या पलीकडे जाऊन काम सुरू आहे. रत्नागिरी हा एकमेव जिल्हा असेल की, या जिल्ह्यात असणाऱ्या सर्व समाजबांधवांसाठी एमआयडीसीतील ३ गुंठे जागेत सभागृह होणार आहे. जगातील पहिले छत्रपती शिवाजी महाराज रिसर्च सेंटर दुसरे कुठे नाही.

या वेळी जिल्हाप्रमुख राहुल पंडित, तालुकाप्रमुख बाबू म्हाप, उपजिल्हाप्रमुख राजन शेट्ये, माजी नगरसेविका स्मितल पावसकर, उद्योजक भाऊ देसाई, शहरप्रमुख बिपीन बंदरकर, माजी नगरसेवक निमेश नायर, अभिजीत दुडये तसेच समस्त प्रभाग क्र. २ मधील नागरिक, महिला वर्ग, युवावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**खड्ड्यांना पाऊस कारणीभूत**

रत्नागिरी शहरातील रस्त्यांना खड्डे आहेत हे नाकारता येत नाही; मात्र मुसळधार झालेला पाऊस याला कारणीभूत आहे. या नैसर्गिक आपत्तीला आपण स्वीकारले पाहिजे. दुसरीकडे रत्नागिरीकरांना काँक्रिटीकरणाचे दिलेले आश्वासन प्रामाणिकपणे पार पाडले असून, त्यातील काही काम पूर्णही झाले आहे. यासाठी जनतेचा आशीर्वाद मिळणार हे नक्की आहे, असा विश्वास यावेळी पालकमंत्री सामंत यांनी व्यक्त केला.

## वेचक

### व्यावसायिकांनी सीसीटीव्ही, अलार्म सिस्टीम बसवावी; चोऱ्या रोखण्यासाठी पोलिसांकडून सूचना

**संगमेश्वर :** देवरूख शहरातील वाढत्या चोरीच्या पार्श्वभूमीवर कोंडगाव येथे ज्वेलर्स व्यावसायिक व पतसंस्था मॅनेजर यांची देवरुख पोलीस निरीक्षक संजय पाटील यांनी जनजागृतीसाठी बैठक घेतली. देवरुख, साखरपा परिसरातील ज्वेलर्स व्यावसायिक आणि पतसंस्थांनी सीसीटीव्ही व अलार्म सिस्टीम बसविणे आवश्यक आहे, अशी सूचना पाटील यांनी केली. देवरुख, साखरपा परिसरात गेल्या काही दिवसात चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे व्यावसायिकांनी सतर्क राहणे आवश्यक आहे. अनोळखी व संशयास्पद दिसणाऱ्या व्यक्तींविषयी जागरूक राहावे, मोबाईलवर येणाऱ्या फेक लिंक किंवा फेक कॉल याविषयी काळजी घेतली पाहिजे, असे पाटील यांनी सांगितले. या प्रसंगी ज्वेलर्स व्यावसायिक, पतसंस्था कर्मचारी, व्यापारी मंडळ अध्यक्ष उपस्थित होते. तसेच व्यावसायिकांनी पोलीस विभागाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले. यावेळी पोलीस निरीक्षक संजय पाटील, पोलीस उपनिरीक्षक मावळणकर, हेड कॉन्स्टेबल नितीन जाधव, वैभव नटे उपस्थित होते. नानासाहेब शेट्ये हॉल येथे ही बैठक झाली.

### पोलीस पाटील बडतर्फ करण्याच्या मागणीसाठी खोपी तांबड ग्रामस्थांचे पुन्हा आमरण उपोषण

**खेड (प्रतिनिधी) :** खेड तालुक्यातील खोपी गावचे पोलीस पाटील प्रशांत भोसले यांना कायमस्वरूपी बडतर्फ करण्याच्या मागणीसाठी खोपी तांबडवाडी येथील ग्रामस्थ पुन्हा स्वातंत्र्य दिनी उपोषण करणार असल्याचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यात आले आहे. पोलीस पाटील भोसले हे नियमबाह्य वागून अवघ्या गावात दहशत माजवत असल्याचा आरोप करून त्यांना तत्काळ बडतर्फ करण्याच्या मागणीसाठी १५ फेब्रुवारी २०२४ रोजी येथील तहसील कार्यालयाच्या आवारात आमरण उपोषण छेडले होते. त्यावेळी पोलीस पाटील प्रशांत भोसले यांना तात्पुरत्या स्वरुपात निलंबित केले होते मात्र बडतर्फ केले नव्हते. याबाबत वारंवार निवेदने सादर करून देखील कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आली नाही. त्यामुळे पोलीस पाटील भोसले हे गावामध्ये त्यांच्या नावाचा मोठा फलक लावत मीच पोलीस पाटील आहे असे सर्वांना भासवत आहेत. त्यामुळे प्रशासनाने वेळीच लक्ष देऊन कार्यवाही केली असती तर पुन्हा उपोषण करण्याची वेळ आली नसती, असे येथील ग्रामस्थांचे म्हणणे आहे. त्यामुळे या अनागोंदी कारभाराबाबत उपोषण छेडले जाणार असल्याचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहे. या निवेदनावर गावातील ३० हुन अधिक ग्रामस्थांच्या सह्या आहेत.

## महायुतीच्या माध्यमातून आगामी लांजा–राजापूर विधानसभेची निवडणूक आपणच लढवणार




लांजा येथील पक्षाच्या बैठकीत बोलताना अजित यशवंतराव.

### अजित यशवंतराव यांची लांजा येथील पक्षाच्या बैठकीत घोषणा

**संतोष कोत्रे / लांजा**

आगामी लांजा-राजापूर विधानसभेची निवडणूक महायुतीच्या माध्यमातून आपणच लढवणार असून तसे आदेश आपल्याला पक्षाचे नेते आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस यशवंतराव यांनी लांजा येथे दिली.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार) गट लांजा तालुक्याच्या प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांसाठीची मार्गदर्शन बैठक राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अजित यशवंतराव यांच्या उपस्थितीत लांजा शहरातील गणेश मंगल कार्यालय येथे पार पडली. यावेळी ते बोलत होते.

यावेळी बोलताना अजित यशवंतराव यांनी बैठकीत उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना आगामी विधानसभा निवडणुकीच्या दृष्टिने मार्गदर्शन केले. ते पुढे म्हणाले की, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी निवडणूक लढविण्यासाठी मला आदेश दिला असून लांजा-राजापूर-साखरपा विधानसभा मतदारसंघात महायुतीच्या माध्यमातून निवडणूक लढविण्यास मी तयार आहे.

मागील १५ वर्षाच्या कालावधीत मतदारसंघात माझ्यावतीने झालेली विकासकामांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवा. तसेच सरकारने नवीन सुरु केलेल्या योजना शहरासह ग्रामीण भागात तळागाळापर्यंत पोहचविणाच्या सूचनाही त्यांनी कार्यकर्त्यांना दिल्या. विधानसभा निवडणुकीचे पडघम वाजू लागले आहेत, त्यामुळे कार्यकर्त्यांनी गाफिल न राहता कामाला लागा, अशा सूचना यावेळी अजित यशवंतराव यांनी कार्यकर्ते व पदाधिकारी यांना केल्या.

या बैठकीला विधानसभा क्षेत्राध्यक्ष संदेश शेट्ये, तालुकाध्यक्ष अभिजीत राजेशिर्के, योगेश वाघधरे, महिला तालुकाध्यक्षा स्मिता दळवी, शहराध्यक्षा मानसी कोपरे, शहर अध्यक्ष प्रमोद आग्रे, युवक शहर अध्यक्ष दीपक शेट्ये, युवक क्षेत्राध्यक्ष राजेश झोरे, उपाध्यक्ष विकास चव्हाण, संजय खानविलकर, विकास मांडवकर, अजित शिगम, माजी सरपंच हरेष जाधव, शैलेश घाग, समीर तेंडुलकर, सरपंच गणेश इंदुलकर, सरपंच गजानन बाणे, मारुती गुरव, अभिजीत सावंत, माजी तालुकाध्यक्षा स्वप्ना सावंत तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दापोली येथे सकल हिंदू समाज संघटना तहसीलदार कार्यालयात एकवटल्या




### उरण व धारावी येथील हत्येप्रकरणी शासनाला दिले निवेदन

**दापोली (प्रतिनिधी)**

दापोली येथे सकल हिंदू समाजबांधवांतर्फे उरण आणि धारावी येथील हत्याप्रकरणी सरकारला निवेदन देण्यात आले आहे.

दापोली तालुका सकल हिंदू समाजाच्यातर्फे सोमवार दिनांक ५ ऑगस्ट रोजी दापोली तहसीलदार कार्यालय येथे मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते. या प्रसंगी उरण येथील यशश्री शिंदे आणि धारावी येथील अरविंद वैश्य यांच्या निर्घृण हत्येप्रकरणी शासनाने हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून दोषींवर कडक कारवाई करावी. पीडितांना तातडीने योग्य न्याय मिळावा तसेच अशा प्रकारच्या विकृत मानसिकतेच्या जिहादींना शासन होण्यासंदर्भात सरकारनं योग्य पाठपुरावा करावा, असे निवेदन दापोली तहसीलदार यांच्यामार्फत मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना अग्रेषित करण्यात आले. याप्रसंगी दापोली तालुका सकल हिंदू संघातील बहुसंख्य बांधव उपस्थित होते.

## मद्यपि मुलाची बापाला मारहाण; गुन्हा दाखल

**खेड (प्रतिनिधी)**

मद्य प्राशन करून घरात येऊन विनाकारण वडिलांना शिवीगाळ व मारहाण करणाऱ्या मुलावर येथील पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना सुकीवली सोनारवाडी येथे घडली. या प्रकरणी गजानन शंकर खांडेकर, रा. सुकीवली सोनारवाडी यांनी येथील पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. तर याप्रकरणी गणेश गजानन खांडेकर याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ४ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास सुकिवली सोनारवाडी येथे राहत्या घरी फिर्यादी हे देवा जवळ दिवाबत्ती करित असताना त्यांचा मोठा मुलगा गणेश हा दारु पिऊन आला व काही कारण नसताना फिर्यादींना शिवीगाळी दमदाटी करु लागला. तसेच लाकडी फाट्याने डोक्यावर मारहाण केली. फिर्यादीची पत्नी सरस्वती गजानन खांडेकर यांनाही ढकलून दिले. याप्रकरणी मुलावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## चालू आर्थिक वर्षात पोषण आहारातून अंडी, केळी गायब

### २ हजार ७७२ शाळांमधील विद्यार्थ्यांना अंडी व केळ्यांची प्रतीक्षा

**रत्नागिरी (वार्ताहर)**

रत्नागिरी जिल्ह्यात २ हजार ७७२ शाळांमधून १,०२,५०७ विद्यार्थी पोषण आहार घेत असून चालू आर्थिक वर्षात शासनाकडून अनुदान न आल्याने जिल्ह्यातील सर्वच शाळांना अंडी आणि केळी मिळणे बंद झाले आहे. मात्र याची दखल पालक, पोषण आहार ठेकेदार आणि शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी घेणे गरजेचे असताना ही बाब मुलांकडून सांगितली जात आहे.

मुलांना अभ्यासाची गोडी लागावी त्याचबरोबर कुपोषणाचे प्रमाण कमी व्हावे यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून महाराष्ट्रातील सर्व विद्यार्थ्यांना पोषण आहार दिला जातो. परंतु रत्नागिरी जिल्ह्यातील १,०२,५०७ विद्यार्थ्यांना पोषण आहार देत असताना त्यांना अंडी आणि केळी यांचे वाटपचं केले जात नाही. तर यासंदर्भात शासनाकडून आदेशचं आलेले नसल्याचे रत्नागिरी जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले. रत्नागिरी जिल्ह्यातील हजारो विद्यार्थी यामुळे सकस अन्नापासून वंचित असून याची दखल वरिष्ठ पातळीवरुन घेणे गरजेचे आहे. परंतु त्याअगोदर स्थानिक पातळीवर लोकप्रतिनिधींनी तसेच येथील पालकमंत्र्यांनी याची मागणी वरिष्ठ पातळीवर लावून धरणे गरजेचे आहे. तरच विद्यार्थी या सकस अन्नापासून वंचित राहणार नाहीत.

## यशश्री शिंदे या तरुणीची निर्घृण हत्या करणाऱ्या नराधमाला भर चौकात फाशी द्या!

### समस्त हिंदू समाजाच्यावतीने तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन

**राजापूर (वार्ताहर)**

उरणमधील यशश्री शिंदे या तरुणीची निर्घृण हत्या करणाऱ्या नराधमाला भर चौकात फाशी द्या आणि हिंदू तरुणींचे संरक्षण होण्यासाठी राज्यात तत्काळ लव्ह जिहाद विरोधी कायदा करा, या मागणीचे निवेदन राजापूर येथील तहसीलदार कार्यालयात समस्त हिंदुत्वनिष्ठ संघटना व समस्त हिंदू समाज यांच्यावतीने सोमवारी देण्यात आले. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना अग्रेषित करण्यात आलेले निवेदन निवासी नायब तहसीलदार दिपाली पंडित यांच्याकडे सुपुर्द करण्यात आले.

उरण येथील यशश्री शिंदे (वय २२) हिची अत्यंत क्रूर पद्धतीने हत्या करण्यात आली. ही मानवतेला काळीमा फासणारी घटना आहे. या घटनेमुळे केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर देशभर संताप व्यक्त होत आहे. या घटनेमुळे श्रद्धा वालकर प्रकरणाची आठवण संपूर्ण देशाला झाली आहे. नवी मुंबईतील विवाहितेच्या शीळ डाकघर परिसरातील खून प्रकरणाची घटना ताजी असतानाच उरणमधील ही घटना अतिशय सुन्न करणारी आहे. ही केवळ पहिली घटना नसून आतापर्यंत अनेक हिंदू मुलींना जाणीवपूर्वक लक्ष्य करण्यात आलेले आहे.

एकूणच राज्यात दिवसेंदिवस लव्ह जिहादची समस्या गंभीर रूप धारण करत आहे. गेल्या काही वर्षांपासून महिलांवर अत्याचाराच्या घटना वाढतच आहेत. देशात खुलेआम युवतींच्या हत्या होत आहेत. त्यामुळे महिला आणि मुलींचे जीवन असुरक्षित झाले आहे. महाराष्ट्रातून २०१९ ते २०२१ या तीन वर्षाच्या कालावधीत एक लाख युवती महाराष्ट्रातून गायब असल्याची माहिती समोर आली आहे. एवढ्या मोठ्या संख्येने महिला गायब होत असतील तर यामागे काही षडयंत्र तर नाही ना? लव्ह जिहादचा प्रकार तर नाही ना? याचीही चौकशी करण्यासाठी गृह खात्याने स्वतंत्र पथक नेमायला हवे. तसेच राज्यात लवकरात लवकर लव्ह जिहाद विरोधी कायदा आणि धर्मांतर बंदी कायदा लागू करावा. लव्ह जिहादची प्रकरणे हाताळण्यासाठी व त्यांचा शोध घेण्यासाठी उत्तर प्रदेश सरकारच्या धरतीवर अँटीरोमिया स्कॉड सारखी पोलिसांची विशेष शाखा स्थापन करावी.

मुस्लीम युवक आणि हिंदू तरूणी यांच्या प्रेमप्रकरणांच्या तक्रारी लव्ह जिहाद म्हणून नोंदवल्या जाव्यात. या प्रकारासाठी विदेशातून होणारा अर्थपुरवठा, युवतींची तस्करी आणि त्यांचा आतंकवादी कारवाईसाठी होणारा वापर याची शासनाने चौकशी करावी आणि त्यात सापडलेल्या दोषींवर अत्यंत कडक कारवाई करावी. या प्रकरणात काही धर्मांध आणि कट्टरतावादी जिहादी संघटना, जिहादी नेते आढळून आल्यास त्यांच्यावरही तत्काळ कठोर कारवाई करण्यात यावी. अशा मागण्या या निवेदनाद्वारे करण्यात आले आहेत.

निवेदन देताना श्रुती ताम्हणकर, गौरी अभ्यंकर, विश्व हिंदू परिषदेच्या माधवी हर्डीकर, भाजपाच्या सुयोगा जठार, माजी नगरसेविका शितल पटेल, विनया शेट्ये, सुधा चव्हाण, प्रतिभा मराठे, संजीवनी मालपेकर, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष रवींद्र नागरेकर, दीपक बेंद्रे, सुभाष पवार, राजाभाऊ रसाळ, संदेश टिळेकर, दिलीप गोखले, मोहन घुमे, विनायक सावंत, हिंदू जनजागृती समितीचे विनोद गादीकर, हिंदवी स्वराज्य प्रतिष्ठानचे महेश मयेकर, बजरंग दलाचे निकेश पांचाळ, ओंकार मित्र मंडळाचे अध्यक्ष विवेक गुरव यांचेसह अनेक हिंदुत्वनिष्ठ यावेळी उत्स्फूर्तपणे उपस्थित होते.



लव्ह जिहाद विरोधी कायदा करा या मागणीचे निवेदन नायब तहसीलदार दिपाली पंडीत यांच्याकडे सुपूर्द करताना श्रुती ताम्हणकर, गौरी अभ्यंकर, माधवी हर्डीकर व अन्य.

## आंबडवे-लोणंद महामार्गावरील समस्या गौरी-गणपतीपूर्वी मार्गी लावू

### संघर्ष समिती सोबतच्या बैठकीत प्रशासकीय अधिकाऱ्यांचे आश्वासन

### मात्र समाधानकारक काम न झाल्यास संघर्ष समिती आंदोलनावर ठाम

**मंडणगड**

आंबडवे-लोणंद राष्ट्रीय महामार्गाच्या दुरवस्थेविषयी मंडणगड तालुका संघर्ष समिती यांच्यावतीने जुलैमध्ये देण्यात आलेल्या निवेदनाच्या पार्श्वभूमीवर तहसीलदार श्रीधर गालीपिल्ले व अभियंता अभिजीत झेंडे यांच्यासोबत आढावा बैठक घेण्यात आली. या प्रसंगी ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. ग्रामस्थांनी मांडलेल्या सर्व समस्या गौरी-गणपतीपूर्वी मार्गी लावू, असे आश्वासन प्रशासनातर्फे देण्यात आले.

मंडणगड येथे झालेल्या सभेला समितीचे अध्यक्ष अरविंद येलवे, सचिन रोशन राजविलकर, समन्वयक विधान पवार, सदस्य आकाश पवार, उमाजी सालेकर, रोहन राजविलकर, दिनेश जांभळे, अतिष धोंडगे, समीर येलवे, मनिष येलवे, तुळशी ग्रामपंचायत माजी उपसरपंच महेंद्र येलवे, अरुण तांबे, अतुल पवार, संकेश कासारे उपस्थित होते.

समितीतर्फे तुळशी घाटात संरक्षण भिंत बांधणे, जागोजागी खचलेला रस्ता सुधारून देणे, रस्त्यावरील खड्डे बुजवून देणे, रस्त्याला पडलेल्या भेगा सुस्थितीत करून देणे, रस्त्यात साठलेला चिखल दूर करून देणे, गटार लाईन सुस्थितीत करून देणे, रस्त्यावरील साईड पट्टी चांगल्या दर्जाची करून देणे. डायव्हर्शन बोर्ड लावणे या मागण्या करण्यात आल्या. या सर्व समस्या गौरी-गणपती सणापूर्वी मार्गी लावण्याचे आश्वासन प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून देण्यात आले. तसेच दुसऱ्या दिवशी समस्या असणाऱ्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन अडचणींची जाणीव करून देण्यात आली. याप्रसंगी अरविंद येलवे, रोशन राजविलकर, आकाश पवार, उमाजी सालेकर उपस्थित होते.

यावेळी महामार्गावरील सर्व ठिकाणे प्रशासकिय यंत्रणेला ग्रामस्थांनी दाखविली. त्यावर कोणती उपाययोजना करण्यात येणार आहे, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे. मात्र समाधानकारक काम न झाल्यास संघर्ष समिती आंदोलनावर ठाम असल्याचे समितीचे अध्यक्ष अरविंद येलवे यांनी सांगितले.

## खाडीपट्ट्यातील बहिरवली–पन्हाळजे मार्गाची दुरवस्था

**खेड (प्रतिनिधी)**

खाडीपट्टा विभागातील बहिरवली फाट्यापासून बहिरवली -पन्हाळजे मार्गाची दयनीय अवस्था झाली आहे. रस्त्याच्या डागडुजीकडे बांधकाम खात्याने केलेल्या दुर्लक्षाचा फटका प्रवाशांना बसत आहे. हा मार्ग सुस्थितीत न आणल्यास खड्ड्यात वृक्षारोपण करण्याचा इशारा काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अजित सुर्वे यांनी बांधकाम विभागाला निवेदनाद्वारे दिला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, सतत वर्दळ असणारा खाडीपट्ट्यातील मार्ग गेले आठवडाभर पडलेल्या पावसामुळे खड्ड्यात गेला आहे. अपघाताचे प्रमाणही वाढले आहे. रस्त्यालगतची झाडेझुडपे तोडण्याची तसदीही संबंधित विभागाने घेतलेली नाही. काही ठिकाणी रस्ताही खचत आहे. यामुळे वाहतुकीसही धोका निर्माण झाला आहे. बांधकाम खात्याने मार्ग सुस्थितीत आणण्यासाठी ठोस पावले न उचलल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता खड्ड्यात वृक्षारोपण केले जाईल, असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

## सतत पडणारा पाऊस आणि वातावरणातील बदलामुळे तापसरीसह डेंग्यूच्या साथीत वाढ

### साथींना अटकाव करण्यासाठी आरोग्य विभागाने कंबर कसली

**राजापूर (वार्ताहर)**

सातत्याने पडणारा पाऊस आणि वातावरणामध्ये झालेल्या बदलावामुळे गेल्या काही दिवसांपासून तापसरीसह डेंग्यूच्या साथीने तालुक्यात डोके वर काढले आहे. डेंग्यूसह तापसरीच्या साथींना अटकाव करण्यासाठी आरोग्य विभागाकडून कंबर कसली जात आहे. घरोघरी असलेल्या कंटेनरची आरोग्य विभागाकडून तपासणी केली जात असून त्यामध्ये १ लाख १२ हजार ८८६ कंटेनरची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये ६७४ कंटेनर दूषित आढळले असून, योग्य त्या उपाययोजना आणि कार्यवाही करण्यात आल्याची माहिती आरोग्य विभागाकडून दिली. शहरासह डेंग्यूचे रुग्ण आढळून आलेल्या गावांमध्ये धूरफवारणीही करण्यात आल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

शहरासह तालुक्याच्या ग्रामीण भागामध्ये डेंग्यूचे २५ रुग्ण आजपर्यंत आढळून आले. त्यापैकी २४ रुग्ण पूर्णपणे बरे झाले असून कार्यरत असलेल्या एका रुग्णाची तब्येत सध्या बरी असल्याचे आरोग्य विभागाकडून स्पष्ट करण्यात आले. बदललेल्या वातावरणाचा प्रतिकूल परिणाम होऊन तापसरी, डेंग्यूसारख्या आजारांनी डोके वर काढले आहे. तापसरीची साथ आणि डेंग्यूचे रुग्ण आढळून आल्याने रोगांचा फैलाव रोखण्यासाठी तत्काळ उपाययोजना सुरू करण्यात आल्या. त्यामध्ये घरोघरी भेटी देऊन विविध प्रकारची तपासणीही करण्यात येत आहेत. त्याचवेळी लोकांशी संवाद साधून डेंग्यूसह अन्य साथींचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून कोणती काळजी घ्यावी, कोणत्या उपाययोजना व्हाव्यात या अनुषंगाने मार्गदर्शन करण्यात येत असल्याची माहिती आरोग्य विभागाकडून देण्यात आली.

## दापोली भाजपातर्फे महिलांसाठी मोफत मार्लेश्वर बस सेवा

**दापोली (प्रतिनिधी)**

दापोली भाजपातर्फे दापोली येथून दर श्रावणी सोमवारी मार्लेश्वर दर्शनासाठी महिलांसाठी मोफत बस सेवा चालू करण्यात आली आहे. पहिल्या श्रावणी सोमवारनिमित्त दिनांक ५ ऑगस्ट रोजी दापोली येथून मार्लेश्वरसाठी मोफत बस सेवा सोडण्यात आली. यावेळी भाजपाचे उत्तर रत्नागिरी जिल्हा अध्यक्ष केदार साठे यांच्या हस्ते या सेवेचा शुभारंभ करण्यात आला.

सोमवारी सकाळी भाजपाच्या माध्यमातून दापोलीमधून दोन बस मार्लेश्वरसाठी सोडण्यात आल्या. तरी या मोफत बससेवेचा महिलांनी जास्तीत जास्त फायदा घ्यावा, असे आवाहन दापोली भाजपच्यावतीने करण्यात आले.



याप्रसंगी केदार साठे, संदीप केळकर, नगरसेविका जया साळवी, अमित तांबे, पूजा साखळकर, अनुजा साळुंखे व महिला वर्ग उपस्थित होता.

## रत्नागिरीत उभारणार जिल्हा कबड्डी असोसिएशनचे कार्यालय

### काही कंपन्या देणार ५० लाखांचा निधी

**रत्नागिरी**

जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या कार्यालयासाठी महाराष्ट्रातील काही कंपन्यांनी ५० लाख रुपये निधी देणार असल्याचे आश्वासन दिले आहे. त्यामधून लवकरच महाराष्ट्र कबड्डी असोसिएशनच्या कार्यालयाप्रमाणे रत्नागिरीचे कार्यालय उभारण्यात येणार आहे. या कार्यालयातून कबड्डी संघ आणि त्यामध्ये खेळणाऱ्यांना न्याय मिळवून देऊ, असे प्रतिपादन पालकमंत्री उदय सामंत केले.

जिल्हा कबड्डी असोसिएशन कार्यकारिणी सभेत ते बोलत होते. या वेळी बालेवाडी पुणे येथे झालेल्या ७१व्या राज्य अजिंक्यपद स्पर्धेत रत्नागिरी जिल्ह्याच्या महिला संघाने उपविजेतेपद पटकावल्याबद्दल त्यांचा सत्कार पालकमंत्री सामंत यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रसंगी सामंत म्हणाले, विविध स्पर्धांमध्ये सातत्याने जिंकण्यासाठी रत्नागिरी जिल्हा कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष म्हणून जे काही सहकार्य करावं लागेल ते करू. चॅम्पियनशिप फक्त एक वर्ष नाही कायस्वरूपी आपल्याकडे राहील, असे काम करूया. महिला कबड्डी संघाने उच्चस्तरावर रत्नागिरीचे नाव पोहचवले आहे. अध्यक्ष झाल्यावर जिल्हा कबड्डी असोसिएशनचे कार्यालय देतो म्हणून जाहीर केले होते. ते कार्यालय लवकरच होईल. या कार्यालयातून कबड्डी संघ आणि त्यामधून खेळणाऱ्यांना न्याय मिळवून द्यायचा आहे. त्यासाठी महाराष्ट्रातील काही कंपन्यांनी आपल्या कबड्डी असोसिएशनला ५० लाख रुपये निधी देणार असल्याचे सांगितले आहे.

यावेळी कार्याध्यक्ष मंगेश तांबे, उपाध्यक्ष मंगेश मोरे, उमेश सकपाळ, दामू जागुष्टे, अभिजीत सप्रे, नितीन बांद्रे तसेच जिल्हा कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते.



## नांदगाव बुद्रुकच्या शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी सुभाष गायकर, उपाध्यक्षपदी अर्चना पागेरे

**बेलगाव कुऱ्हे :** इगतपुरी तालुक्यातील नांदगाव बुद्रुक येथील जिल्हा परिषद शाळेच्या शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी सुभाष उपाध्यक्ष पदी अर्चना पागेरे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीचे स्वागत ग्रामस्थांनी केले. यावेळी पालक सदस्य पदी अश्विनी संपत रायकर, कविता गायकर, रेणुका पावडे, मीना शिरसाठ, अनिल पगारे, शांताराम पागेरे, भानुदास मांडे, सुखदेव गायकर, निवृत्ती गोधडे यांचीही निवड झाली. शाळेच्या विकासासाठी नेहमीच कटिबद्ध असल्याचे नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी सांगितले. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक बलसिंग परदेशी, नितीन पवार, सागर जळगावकर, उमेश बैरागी, देवराम भले, अशोक मेदडे, राजू सोळंकी, राजेंद्र पवार, छायावती देवरे, भारती माठे आदी शिक्षक, ग्रामस्थ उपस्थित होते.

# दुय्यम निबंधक कार्यालयाकडून भूमाफियांची पाठराखण

## चौकशी अहवालात शब्दच्छल, संशयितांना संशयाचा फायदा देण्याचा प्रयत्न

**नाशिक (प्रतिनिधी) :**

नाशिक डायोसेशन ट्रस्ट भूखंड कांड मधील शहरातील प्रसिद्ध एच. जोशी गॅसचे संचालक राघवेंद्र जोशी यांनी ९९९ वर्षाच्या करारावर घेतलेला भूखंड वादग्रस्त ठरलेला असतानाही नोंदणी व मुद्रांक विभागाकडून कुठलीही कारवाई न झाल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. याप्रकरणी नाशिक डायसेशन कौन्सिलने आपल्या खुलाशात तोतया ट्रस्टी जवाहर उजागरे याचा मिळकतीशी कुठलाही संबंध नसून नामसाधर्म्याचा फायदा घेत खोडशाळपणाने दस्त नोंदवल्याचे म्हटले आहे. असे असताना दुय्यम निबंधक विजय राजुळे यांनी वरिष्ठांना अहवाल सादर करताना केलेला शब्दच्छल संशयितानाच संशयाचा फायदा देत असल्याचा निष्कर्ष जाणकार काढतात. अहवालात शब्दच्छल करून भूमाफियांची पाठराखण केल्याचे स्पष्ट दिसत आहे.

एवढेच नाही तर तत्कालीन दुय्यम निबंधक संजय ठाकरे यांची देखील पाठराखण केल्याने राजुळे यांच्या भूमिकेबाबत संशय निर्माण केला जात आहे.दस्त नोंदणी प्रक्रियेत असलेली पळवाट अशा संशयास्पद व्यवहारांना खतपाणी घालत आहे.

याच पळवाटेचा फायदा घेऊन नाशिक डायोसेशन ट्रस्टच्या भूखंड कांडमध्ये शहरातील नामवंत एच.जोशी गॅसचे संचालक राघवेंद्र जोशी यांनी जवळपास १ हजार वाराचा भूखंड तब्बल ९९९ वर्षाच्या करारावर घेतल्याचे प्रकरण नुकतेच उघडकीस आले. या भूखंडाचे शासकीय मूल्य ४ कोटी ८६ लाख ३२ हजार इतके असून बाजार मूल्य यापेक्षा जास्त आहे.

मास्टरमाईंड अजय श्रीवास्तव आणि तोतया ट्रस्टी जवाहर उजागरे यांनी संगनमताने या भूखंडाचे दस्त बेकायदेशीररित्या नोंदवून दिले आहे. या दस्त नोंदणीत तत्कालीन दुय्यम निबंधक संजय ठाकरे यांची भूमिका संशयास्पद असून त्यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्याची मागणी समस्त ख्रिश्चन बांधवांनी केली आहे.

राघवेंद्र जोशी यांनी दस्त नोंदणी केल्यानंतर याप्रकरणी वाद उपस्थित झाला होता. मात्र नोंदणी व मुद्रांक विभागाने याबाबत न्यायालयाकडे बोट दाखवून आपली जबाबदारी झटकली होती. सह दुय्यम निबंधक विजय राजुळे यांनी तत्कालीन सह जिल्हा निबंधक कैलास दवंगे यांच्याकडे चौकशी अहवाल सादर केला. दवंगे यांनीही या अहवालावर हे वृत्त लिही पर्यंत कुठलीच कारवाई न केल्याने दुय्यम निबंधक कार्यालयाच्या हेतूवर संशय घेण्यास पुरेसा वाव मिळतो.

या अहवालात डायसेशन कौन्सिलने सादर केलेल्या खुलाशात दस्त क्रमांक २४७६ /२०२० नोंदविताना जवाहर उजागरे या इसमाने आमच्या कार्यालयाचा पत्ता दिला आहे. नाशिक डायसेशन ट्रस्ट असोसिएशन प्रा. लि. चा आणि नाशिक डायोसेशन कौन्सिल पीटीआरडी २ चा कुठलाही संबंध नाही. उजागरेने शासनाची दिशाभूल केली आहे.त्यांचे कार्यालय आमच्या संस्थेच्या कार्यालयीन जागेत उपलब्ध नाही. सदर उजागरे हा ट्रस्टचा कुठल्याही स्वरूपाचा लाभधारक नाही सदरचे दस्त नोंदविताना खोडशाळपणाने व दिशाभूल करण्याच्या दृष्टीने नामसाधर्म्याचा फायदा घेऊन नोंदवले असल्याचे म्हंटले आहे.

या प्रकरणात संबंधित तक्रारदारांनी दस्त क्रमांक २४७६ /२०२० रद्द करण्याची मागणी केली आहे. तथापि नोंदणी झालेला दस्त रद्द करण्याचे अधिकार नोंदणी कायद्याने या कार्यालयास नाही.त्या मुळे तक्रारदार यांनी योग्य त्या न्यायालयात दाद मागावी. असे सह दुय्यम निबंधक विजय राजुळे यांनी आपल्या अहवालाच्या शेवटी म्हटले आहे. जर नोंदणी आणि मुद्रांक विभागाला नोंदणी झालेले दस्त रद्द करण्याचे अधिकार नसतील तर कुठलाही दस्त नोंदविताना किमान मालकी हक्क बघणे गरजेचे आहे. तसे न केल्यामुळे नोंदणी झालेल्या दस्तांमुळे अनेकांना मनस्ताप झालेला आहे. एखादा विषय अंगावर आल्यानंतर दुय्यम निबंधकाकडून महाराष्ट्र नोंदणी नियमावली १९६१ मधील नियम क्रमांक ४४ ची आठवण होते. या कायद्याने दुय्यम निबंधकांचे संरक्षण होत. दुय्यम निबंधकांचे पूर्णपणे संरक्षण होत असल्याने ही मंडळी कुठलेही दस्त बिनदिक्कत नोंदवून देत आहे. त्यामुळे या कायद्यातच बदल करण्याची मागणी आता सर्वसामान्यांमध्ये होऊ लागली आहे.




## डायोसेशन भूखंड कांड

> या संदर्भात प्राप्त तक्रारीची शहनिशा करून या कार्यालयाचा अहवाल सह जिल्हा निबंधक वर्ग यांना सादर केला आहे. लिहून देणार आणि घेणार या दोघांचेही म्हणणे या अहवालात नमूद आहेत.
>
> **- विजय राजुळे**, सहदुय्यम निबंधक वर्ग २

डायोसेशन कौन्सिलचा खुलासा इतका स्पष्ट असताना त्याचवेळी नोंदणी व मुद्रांक विभागाने कारवाई करणे अपेक्षित असताना अधिकाऱ्यांनी बोटचेपे भूमिका घेतली.

रचना शाळेच्या बाबतीत मात्र मुंबई नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला ही नोंदणी विभागाची दुटप्पी भूमिका असून रचना शाळेप्रमाणे कारवाई होणे गरजेचे असताना नोंदणी विभागाने भूमाफियांची पाठराखण केल्याचे स्पष्ट होत आहे.त्यामुळे या प्रकरणाची पुन्हा नव्याने चौकशी करून गुन्हा दाखल करण्याची मागणी समस्त ख्रिश्चन बांधवांनी केली आहे.

## वेचक

### प्रधान सचिव एकनाथ डवले यांची त्र्यंबकेश्वरला भेट, तहसील कार्यालयात केली वॉर रूमची पाहणी; लाडकी बहीण योजनेचा घेतला आढावा



**त्र्यंबकेश्वर :** राज्याचे ग्रामविकास व पंचायत विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले यांनी त्रंबकेश्वर येथे भेट देऊन लाडकी बहीण योजनाची अंमलबजावणी सुरू असलेल्या त्र्यंबकेश्वर तहसील कार्यालयातील कक्षाला वॉर रूमची पाहणी केली. कार्यालयीन कामकाजाची माहिती घेतली. तहसीलदार श्वेता संचेती यांनी त्यांना माहिती दिली. यावेळी जिल्हा परिषदेचे अर्जुन गुंडे ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रतिभा संगमनेरे, वर्षा पडोळ सोनिया नाकाडे किसन खताळे हे संबधित अधिकारी उपस्थित होते. महिरावणी येथे बचत गट, गोवर्धन ग्रामपंचायत या ठिकाणी देखील डवले यांनी भेटी दिल्या. यापूर्वी विभागीय आयुक्त असताना २०१५-१६ च्या कुंभमेळ्यात एकनाथ डवले यांनी त्र्यंबकेश्वर नाशिक सिंहस्थ कुंभमेळ्यात काम केल्याची आठवण देखील उपस्थिताना झाली.

### प्रहार संघटनेतर्फे ९ रोजी संभाजीनगरला राज्यस्तरीय मोर्चा

**चांदवड :** गोरगरीब, निराधार, शेतकरी, दिव्यांग, विधवा, शेतमजूर आदींच्या प्रलंबित मागण्यांसाठी प्रहार संघटनेचे अध्यक्ष आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली दि. ९ ऑगस्ट रोजी छत्रपती संभाजीनगर येथे विभागीय आयुक्त कार्यालयावर राज्यस्तरीय मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती प्रहार संघटनेचे चांदवड तालुकाध्यक्ष नीलेश क्षीरसागर यांनी दिली. दिव्यांगाना आंध्र प्रदेशप्रमाणे दरमहा सहा हजार रुपये अनुदान द्यावे, स्वतंत्र दिव्यांग विद्यापीठ स्थापन करावे, निराधार व्यक्तीचे अठरा वर्षानंतर पुनर्वसन करावे आदी मागण्या करण्यात येणार असून या मोर्चात जिल्ह्यातील दिव्यांगांसह शेतकरी, शेतमजूर, वंचित घटकांनी सहभागी होण्याचे आवाहन प्रहार संघटनेने केले आहे.

# त्र्यंबकेश्वर नैसर्गिक नाला अतिक्रमण जैसे थे

**नाशिक (प्रहार वृत्तसेवा):**

त्र्यंबकेश्वर गट क्रमांक २९९/१ मधील नैसर्गिक नाल्याचा विषय गंभीर असताना तसेच ऐन पावसाळ्यात नाला बुजवून लेआउट केल्याच्या प्रकरणाला वाचा फोडून देखील नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी श्रीया देवचक्के यांना कामाच्या व्यस्ततेमुळे संबंधित प्रकरणाकडे लक्ष देण्यासाठी अजिबात वेळ नसल्याचे त्यांनी सांगितले. नैसर्गिक नाल्यांचा विषय गंभीर असताना अधिकाऱ्यांची याबाबत असलेली उदासीनता भविष्यातील नैसर्गिक आपत्तीची नांदी ठरू शकते.

त्र्यंबकेश्वर येथे गट क्रमांक २९९/१ मध्ये नैसर्गिक नाला असताना या नाल्याचा मोठा भाग बुजवून एका विकासकाने लेआउट टाकला आहे. विकासकाने नाल्याची रुंदी अगदीच कमी केल्याने पाण्याच्या प्रवाहाला अडथळा निर्माण झाला आहे.याप्रकरणी दै 'प्रहार'ने वाचा फोडल्यानंतर नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी श्रीया देवचक्के यांनी संबंधित विकासकाला नाल्यातील बांधकाम काढून घेऊन नाला पूर्ववत करण्याचे आदेश दिले. मात्र विकासकाने मुख्याधिकाऱ्यांच्या आदेशाला कुठलीही दाद दिली नसल्याचे दिसून येत आहे. नाल्यातील अतिक्रमण अद्यापही जैसे थे असून त्र्यंबक येथील विकासक मुख्याधिकाऱ्यांच्या आदेशाला जुमानत नसल्याचे यावरून दिसून येत आहे.

याप्रकरणी काय कारवाई केली यासाठी मुख्याधिकारी श्रीया देवचक्के यांना संपर्क साधला असता कामाच्या व्यस्ततेमुळे त्या ठिकाणी जाता येत नसल्याचे उत्तर त्यांनी दिले. ऐन पावसाळ्यात नाल्याचा विषय गंभीर असताना मुख्याधिकाऱ्यांनी दिलेले उत्तर गांभीर्याची जाणीव नसल्याचे दिसून येत आहे.सध्या पावसाचे दिवस असताना नैसर्गिक नाल्यांमधून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग होत आहे.

नैसर्गिक नाल्यांचा प्रवाह अडवणे किंवा बुजवणे कायदेशीर गुन्हा असताना शासकीय अधिकाऱ्यांकडून या बाबीकडे पूर्णतः दुर्लक्ष होत आहे. यातूनच नैसर्गिक आपत्ती उद्भवत आहे. नैसर्गिक नाले बुजविल्याने डोंगरदऱ्यांमधून आलेले पाणी नागरी वस्तीत घुसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे विकासकांशी असलेल्या आर्थिक सलोख्यांमुळे मुख्याधिकाऱ्यांनी डोळ्यावर पट्टी बांधली आहे का? असा सवाल उपस्थित केला जात आहे. या प्रकरणी कारवाई न केल्यास विभागीय कार्यालयासमोर मोठे आंदोलन छेडण्याचा इशारा तक्रारदाराने दिला आहे. दरम्यान नद्या, नाले, गौण खनिज अशा नैसर्गिक संपत्तीवर नियंत्रण ठेवणारे महसूल खातेही या नाले प्रकरणाकडे दुर्लक्ष करीत असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.



## कार्यव्यस्ततेमुळे मुख्याधिकाऱ्यांना मिळेना वेळ; प्राधान्यक्रमाचे गांभीर्य हरवले

> सध्या एका मागून एक बैठका सुरु आहेत. व्हॉट्स अप वर बैठकांचे संदेश आले की तिकडे जावे लागते. सध्या अजिबात वेळ नाही. जेव्हा वेळ मिळेल तेव्हा साईट व्हिजिट करू. खातरजमा करून आवश्यक ती कार्यवाही केली जाईल.
>
> **- श्रीया देवचक्के**, मुख्याधिकारी,न.प. त्र्यंबक

# चांदवडला आतापर्यंत सरासरी ४७८ मिमी पावसाची नोंद

**चांदवड (प्रतिनिधी):**

चांदवड तालुक्यात गत दोन दिवसात झालेल्या संततधार पावसामुळे बळीराजा सुखावला आहे.त्यामुळे गत दोन महिन्यांपासून पावसाच्या प्रतीक्षेत असलेला शेतकरी वर्ग शेतीमाला लागला आहे. काल (दि.५) चांदवड तालुक्यात आत्तापर्यंत सरासरी मि.मी.पावसाची नोंद झाली आहे.

पावसाळ्याच्या सुरुवातीलाच तालुक्यात पावसाने दमदार हजेरी लावली होती.हवामान विभागाकडून वर्तविण्यात आलेल्या अंदाजानुसार पुढेही चांगला पाऊस पडेल व शेती पिकांचे भरघोस उत्पादन होईल या आशेवर शेतकरी बांधवांकडून मोठ्या प्रमाणात मका, सोयाबीन, बाजरी, मुग, भुईमूग व अन्य खरीप पिकांची लागवड करण्यात आली.मात्र पावसाने अनपेक्षित दांडी मारत शेतकऱ्यांना आसमानी संकटात टाकले.पावसाने दोन महिने हेलकावत ठेवल्याने पिकं करपु लागली व दुबार पेरणीचे संकट बळीराजावर घोंगावू लागले होते.

गेल्या दोन दिवसात पाऊस पडल्याने पिकांना जीवदान मिळाले असून बळीराजा सुखावला आहे. शेती कामासह शेतकरी बांधवांकडून शेती मशागतीस वेग मिळाला आहे.

**अजूनही दमदार पाऊस अपेक्षित**

चांदवड तालुक्यातील शेती व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न पुर्णतः पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे.दोन दिवसात चांगला पाऊस पडला असला तरी पाझर तलाव, नालाबल्डींग, लघु पाटबंधारे, जलयुक्त शिवार योजनेतील तलाव, गावतळे, विहिरी व बोअरवेल अद्यापही कोरडेठाक आहेत.त्यामुळे एकीकडे पिकांना जीवदान मिळत असले तरी दुसरीकडे पिण्याचा पाणीप्रश्न ऐरणीवर आहे.अद्यापही अनेक गावे व वाडी-वस्तींवर शासकीय टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे. शेती व पिण्याचा पाणी पाणीप्रश्न सुटण्यासाठी तालुकावासियांसह प्रशासनानेही निसर्गाकडे लक्ष लागून आहे.

**तालुक्यात मंडलनिहाय पाऊस असा:** तालुक्यात काल (दि.५) चांदवड - ५९.५ (४८८.८), रायपुर - २७.५ (१४३.१), दिघवद - ३६.५ (३९२.३), दुगाव - ५६.५ (२१९.९), वडनेरभैरव – ३२.८ (५५६.२), वडाळीभोई – ६२.८ (६६५.३), धोडंबे – ८१.० (८८२.३) प्रमाणे एकुण – १७३.२ (३३४७.९) तर सरासरी – ४६.७ (४७८.३) पावसाची नोंद करण्यात आली आहे.

# देवळा पोलिसांच्या हद्दीत घरफोड्यांचा उच्छाद; नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

**देवळा (प्रतिनिधी):**

देवळा येथील ज्ञानेश्वर नगर (वाखारी रोड) मध्ये झालेल्या धाडसी घरफोडीचा प्रकार ताजा आतांना रविवारी दि ४ रोजी पुन्हा शहरातील शिवाजी नगरमध्ये बंद घराचा कडी कोयंडा तोडून चोरीचा प्रकार घडल्याने नागरिकांचा सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे .त्याच मध्यरात्री अजून तीन ते चार ठिकाणी अज्ञात चोरट्यांनी आपला मोर्चा वळवून यात चार दुचाकी लंपास केल्याची घटना घडली आहे . यात मोतीनगर मध्ये राहणारे शरद आहेर यांची स्प्लेंडर मोटरसायकल सोमवारी दि ५ रोजी सकाळी ६ वाजता चोरीस गेली असून,चोरटे सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाले आहेत . गेल्या दोन महिन्यांपूर्वीच शरद आहेर यांच्या शेतातून ट्रॅकर व ट्रोली ची चोरी झाली आहे .याचा छडा छडा अद्याप लागलेला नाही. देवळा पोलिसांत या घटनांबाबत तक्रार दाखल करण्यात आली आहे .

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार देवळा शहरातील शिवाजी नगर मध्ये राहणारे सेवानिवृत्त शिक्षक शंकर विश्वनाथ आहेर हे सपत्नीक नाशिकला गेल्याने अज्ञात चोरट्यांनी घर बंद असल्याचा फायदा घेत रविवारी दि ४ रोजी रोजी रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन कडी कोयंडा तोडून घरात कपाटातील समान अस्ताव्यस्त करत रोख पंधरा हजार रुपये व काही मौल्यवान वस्तू चोरून नेल्या असल्याची माहिती आहेर यांनी पोलिसांना दिली आहे .

त्याच बरोबर परिसरात तीन ते चार ठिकाणी या अज्ञात चोरट्यांनी चोरी केल्याचा प्रकार घडला असून यातील एकाची दुचाकी चोरून नेल्याची घटना घडली आहे.यामुळे उपनगरात राहणाऱ्या ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून , पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवावी अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान , देवळा शहरात गेल्या महिन्यात धाडशी घरफोडी झाली असून, पोलिसांनी या भामट्याला नंदुरबार मध्ये पकडून अटक केली आहे .मात्र ही घटना ताजी असताना पंधरा दिवसांनी पुन्हा चोरी चे प्रकार घडल्याने देवळा पोलिसांसमोर या अज्ञात चोरट्यांचा बंदोबस्त करण्यासाठी आव्हान उभे ठाकले आहे.

# शिर्डीत श्री साईसच्चरित पारायण सोहळ्यास मंगलमय वातावरणात सुरुवात



**शिर्डी (प्रतिनिधी) :**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी, नाट्य रसिक मंच, शिर्डी आणि शिर्डी ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार दि.५ ऑगस्ट, २०२४ ते सोमवार दि १२ ऑगस्ट २०२४ या कालावधीत चालणाऱ्या श्री साईसच्चरित पारायण सोहळ्याला काल सोमवारी मंगलमय वातावरणात सुरुवात झाली असून, या पारायण सोहळ्यात अंदाजे सुमारे ५ हजाराहुन अधिक महिला व १ हजार ५०० हून अधिक पुरुष असे सुमारे ६ हजार ५०० पेक्षा अधिक पारायणार्थींनी सहभाग घेतला.

काल सकाळी समाधी मंदिरातून श्रींच्या श्री साईसच्चरित या पवित्र ग्रंथाची व फोटोची हनुमान मंदिर व द्वारकामाई मार्गे साईआश्रम भक्तनिवास येथील पारायण मंडपापर्यंत सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणूकीत संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी पोथी, उपकार्यकारी अधिकारी तुकाराम हुलवळे व कार्यकारी अभियंता भिकन दाभाडे यांनी श्रींची प्रतिमा, व मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांच्या सुविद्य पत्नी सौ.वंदना गाडीलकर यांनी कलश घेऊन सहभाग घेतला.यावेळी नाट्य रसिक मंच, शिर्डी यांचे पदाधिकारी, शिर्डी ग्रामस्थ व साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. गेट नंबर चार पासून ते पारायण मंडपापर्यंत १० पुरूष लकी ड्रॉ भाग्यवान साईभक्तांनी टप्या-टप्याने श्री साईबाबांची तसबीर घेऊन तर प्रत्येकी २० महिला लकी ड्रॉ भाग्यवान साईभक्तांनी टप्या-टप्याने श्री साईबाबांची पोथी व कलश घेऊन सहभाग नोंदविला. यावेळी प्रशासकिय अधिकारी विश्वनाथ बजाज, मंदिर प्रमुख विष्णु थोरात, नाटय रसिक मंचाचे पदाधिकारी, मंदिर पुजारी, संस्थानचे कर्मचारी, ग्रामस्थ व साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. मिरवणूक पारायण मंडपात आल्यानंतर संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर व मान्यवरांच्या हस्ते ग्रंथ व कलश पूजन करुन, श्री साईसच्चरित पारायण वाचनाचा शुभारंभ करण्यात आला. सकाळी ७.०० ते ११.३० पुरूष वाचक व दुपारी १.०० ते ५.३० महिला वाचक यांचे यावेळेत श्री साईसच्चरिताचे वाचन करण्यात आले. दुपारी ३.०० ते ५.०० यावेळेत अनहद ग्रुप, नाशिक यांचा संगीतमय भक्तीसंगीत कार्यक्रम, सायंकाळी ५.३० ते ६.३० यावेळेत ज्ञानदेव गोंदकर यांचा समाधीनंतर श्री साईबाबांचे साक्षात्कार या विषयावर प्रवचन व रात्री ७.३० ते ९.३० यावेळेत हभप सुजाता पा. कदम चाळाखेकर, नांदेड यांचा किर्तनाचा कार्यक्रम गेट क्रमांक तीन समोरील श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडपात होणार आहे.

# अंबड औद्योगिक वसाहतीतील रस्त्यांच्या विकासासाठी 'तो' ५५ कोटींचा निधी उपलब्ध करून द्या; वंचित आघाडीचे महापालिका आयुक्तांना निवेदन

**नाशिक (प्रतिनिधी):**

भूसंपादनासाठीचा ५५ कोटींचा तो निधी स अंबड व सातपूर औद्योगिक वसाहतीतील रस्त्यांच्या कामांसाठी उपलब्ध करून देऊन उद्योजकांना दिलासा द्यावा,अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे महानगराध्यक्ष अविनाश शिंदे यांनी महापालिका आयुक्तांकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.आयुक्त जागेवर नव्हतेच उपायुक्त एकही जागेवर हजर नसल्याने निवेदन स्वीकारला महानगरपालिकेत कोणीही उपलब्ध नसल्याने आयुक्तांच्या दरवाजावर निवेदन चिपकवण्यात आले

नाशिक महानगरपालिका प्रशासनाने नुकत्याच वादग्रस्त ५५ कोटींच्या भूसंपादनाचा मोबदला म्हणून विकासकांच्या लॉबीला घाईघाईने धनादेश देण्याचा घाट उघडकीस आल्याने हा संपूर्ण प्रकार जणू संशयास्पद असल्याचेच बोलले जाते.महापालिका आयुक्तांची बदली प्रस्तावित असल्याने जाता जाता शेवटचा हात फिरवण्याचा त्यांचा प्रयत्न तर नाही ना? अशी शंका उपस्थित होणे स्वाभाविक आहे. सर्वच पक्षांनी याबाबत काहीतरी पाणी मुरतंय अशी शंका उपस्थित केल्याने महापालिकेच्या कारभारावरच एकप्रकारे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.एकीकडे शहरातील विकास कामांसाठी निधी नसल्याचे सांगायचे आणि दुसरीकडे विकासकांना खुश करण्यासाठी निर्णय घ्यायचे, या कार्यपद्धतीवर चौफेर टीका होत आहे.




५५ कोटीचा हा निधी औद्योगिक वसाहतीतील रस्त्यांचा विकास, रुंदीकरण आणि डागडुजीसाठी वापरल्यास निदान उद्योजक तरी महापालिकेत धन्यवाद देतील आणि उत्पादनांच्या जलद वाहतुकीचा मार्ग त्यामुळे मोकळा होईल यात शंका नाही. नाशिकचे उद्योजक महापालिकेला मोठ्या प्रमाणात कर देतात. परंतु त्या तुलनेने त्यांना त्यांना सोयी सुविधा मिळतात का हा खरा सवाल आहे, असे अविनाश शिंदे यांनी निवेदनात म्हटले आहे.

ते पुढे म्हणतात,सातपूर आणि अंबड औद्योगिक वसाहतीतील रस्त्यांची अवस्था तर अक्षरशः दयनीय आहे.गरवारे पॉइंट पपया नर्सरी हा मंजूर रस्ता ४५ मीटरचा असला तरी अस्तित्वात असणारा रस्ता १४ मीटर आहे.अंबड एमआयडीसीत जाणारा रस्ता मंजूर रस्ता ३० मीटरचा असला तरी अस्तित्वात असणारा रस्ता ७.५० मीटर इतकाच आहे. अंतर्गत छोटे मंजूर रस्ते २१ मीटरचे असताना अस्तित्वात असणारा रस्ता फक्त ३.५० मिटर इतकेच असल्याने इतक्या अरुंद रस्त्यांवरून वाहने हाकतांना वाहनचालकांची अक्षरशः दमछाक होते. अनेक टँकर्स,कंटेनर्स चालकांना वाहने चालविताना मोठी कसरत करावी लागते.अरुंद रस्ते आणि त्यात या रस्त्यांची दयनीय अवस्था यामुळे उद्योजकांना फार मोठ्या हाल अपेष्टांना सामोरे जावे लागते.अनेकांनी या गोष्टींना वैतागून आपले प्रकल्प अन्यत्र नेले आहेत, ही वस्तुस्थिती आहे. नाशिकच्या औद्योगिक विकासाच्या दृष्टीने ही बाब निश्चितच भूषणावह नाही.इतर राज्यातील सरकारे उद्योजकांसाठी पायघड्या टाकून त्यांना आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देत असताना दुसरीकडे आपण त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात कर घेऊनही साध्या रस्त्यासारख्या सुविधा उपलब्ध करून देऊ शकत नाही ही बाब लाजिरवाणीच म्हणावी लागेल. उद्योगाच्या सर्वांगीण विकासासाठी नाशिक हेच एकमेव डेस्टिनेशन आहे. त्यामुळे अंबड आणि सातपूरच्या औद्योगिक वसाहतीत प्रशस्त रस्ते तसेच एसटीपी प्लांट यासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देणे गरजेचे असल्याचेही शिंदे यांनी निवेदनात शेवटी स्पष्ट केले आहे.

नाशिक महानगरपालिकेत आयुक्तांना निवेदन द्यायला गेले असताना आयुक्त जागेवर नव्हतेच उपायुक्त एकही जागेवर हजर नसल्याने निवेदन स्वीकारला महानगरपालिकेत कोणीही उपलब्ध नसल्याने आयुक्तांच्या दरवाजावर निवेदन चिपकवण्यात आले व आयुक्तालयाचा निषेध करण्यात आला याप्रसंगी माजी सभापती संजय साबळे माजी नगरसेवक बजरंग शिंदे वामनदादा गायकवाड सुनील साळवे सुरज गांगुर्डे संदीप काकडीच प्रदीप खडसे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# बौद्ध धम्म संस्कार केंद्रे निर्माण करणार

## पप्पू कागदे : मौज येथील बौद्ध विहारास दहा लाखाचा निधी

बीड/प्रतिनिधी

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असलेली बुद्ध धम्माची चळवळ गतिमान करण्याचा संकल्प घेऊन रिपाइंच्या माध्यमातून केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या फंडातून युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हा अध्यक्ष पप्पू कागदे यांनी मौज तालुका बीड येथील बुद्ध विहारासाठी दहा लक्ष रुपयाचा निधी उपलब्ध करून दिला आहे.

केंद्रीय मंत्री रामदास आठवले बुद्ध धम्माची चळवळ गतिमान करण्याचे कार्य रिपाइंच्या माध्यमातून देशपातळीवर करीत आहेत.हाच संकल्प घेऊन बुद्ध विहाराच्या माध्यमातून बुद्ध धम्म संस्कार केंद्रे निर्माण करण्याचे काम करण्यात येत आहे. त्यासाठी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइं बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी पाठपुरावा करुन सम्यक समृद्ध विहार नागोबा गल्ली बीड, नागसेन बुद्ध विहार धानोरा रोड बीड, बुद्ध विहार भीमराज नगर राजुरी वेस बीड, कामखेडा, नाथापूर, पालवन,बेलखंडी पाटोदा, पिंपळादेवी, ढेकनमोहा, देवी दहिफळ, राक्षस भुवन ता. गेवराई, हातोला ता.अंबाजोगाई, कवडगाव



तालुका केज, शिवणी व मौज या सर्व ठिकाणी दहा लक्ष रुपये निधी देऊन बुद्ध विहारे उभारण्यात आली आहेत. बुद्ध धम्माचा प्रसार व प्रचार करण्यासाठी व बुद्ध विचारांच्या माध्यमातून धम्म संस्कार केंद्र निर्माण करण्यासाठी आज रोजी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी मौज तालुका बीड येथील बुद्ध विहारासाठी मंत्री रामदास आठवले यांच्या फंडातून दहा लक्ष रुपये फंडाचे मंजुरी पत्र भन्ते धम्मशील थेरो यांच्या उपस्थितीत महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष मायाताई मिसळे यांना रिपाइं कार्यालयात देण्यात आले. यावेळी राजू जोगदंड, किसन तांगडे, दशरथ सोनवणे, प्रभाकर चांदणे, आप्पा मिसळे, क्रांती मिसळे, रेखा मिसळे, ज्योती ढोबळे, संगीता मिसळे, वैशाली मिसळे, कुसुम मिसळे, अनिता तुरुकमारे, अविनाश जोगदंड, भैय्या मस्के, दिलीप खंदारे आदी उपस्थित होते.

# तलवाडा सर्कलमध्ये ड्रोनचा धुमाकूळ

**भयभित : ग्रामस्थ हैराण रात्रीच्यावेळी ड्रोन कॅमेऱ्याच्या घिरट्या**




तलवाडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा सर्कल मध्ये गेल्या पाच दिवसांपासून ड्रोन ने धुमाकूळ घातला असून ग्रामस्थ हैराण झाले आहेत दररोज कुठल्या ना कुठल्या गावात ड्रोन रात्रीला घिरट्या घालताना दिसुन येतोय. हा ड्रोन नेमका कशासाठी घीरट्या घालतोय या मागचे नेमके कारण तरी काय याबाबत वेगवेगळे तर्क वितर्क लावण्यात येत आहेतपांढरी, भोगलगाव, गोविंदवाडी, आदीसह गोदा पट्ट्या गेल्या पाच दिवसापासून रात्री आकाशात ड्रोन घीरट्या घालत आहे दि.४ रोजी गोविंदवाडी, येथुन गेला ड्रोन दिं.५ रोजी रात्री आठ वाजता पांढरी गावात फिरून भोगलगाव येथे गेला व परिसरात ड्रोन ने घीरट्या घातल्या आशी माहिती ग्रामस्था कडून मिळाली.

दररोज ड्रोन तलवाडा हद्दीतील गोदापट्यात परिसरामधील बहुतांश गावामध्ये हा ड्रोन फिरत आहे याची दखल घेऊन पोलीस प्रशासनानी याची दखल घ्यावी व तत्काळ शोध लावावा अशी मागणी नागरिकांतुन होत आहे. काही दिवसापूर्वी कोल्हेर येथे ड्रोनने घिरट्या घातल्या होत्या. या ड्रोनच्या घिरट्या मुळे ग्रामस्थात भीतीचे वातावरण पसरले असून या ड्रोन मागचे नेमके कारण काय हे कळेनासे झाले आहे.व या ड्रोन च्या घिरट्या संदर्भात वेगवेगळे तर्क वितर्क लावण्यात येत आहेत.

# कंकालेश्वर विद्यालयात लेखन फलकांचे वाटप!

**ऋणानुबंध:अनिलदादा जगताप यांचा उपक्रम**



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

गरजवंतांना मदतीचा हात देऊन समाजसेवेसाठी सदैव तत्पर असणारे शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या वतीने काल दि. २ ऑगस्ट रोजी दु. १२.०० वाजताच्या दरम्यान कंकालेश्वर विद्यालयात लेखन फलकांचे (व्हाईट बोर्ड) वाटप करण्यात आले.

बीडमधील दुर्गम भागात असणाऱ्या कंकालेश्वर विद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांना काही दिवसांपूर्वी शिवसेनेच्या वतीने अनिलदादा जगताप यांनी वाह्यांचे वाटप केले होते. दरम्यान शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षकांनी शाळेला लेखन फलकांची (व्हाईट बोर्ड) आवश्यकता असल्याचे सांगितले होते. शाळेची गरज लक्षात घेऊन अनिलदादा यांनी कंकालेश्वर विद्यालयात सहा लेखन फलकांचे वाटप करून मदत केली. अनिलदादा जगताप यांच्या वतीने शिवसेनेचे बीड विधानसभा प्रमुख सुनील अनभुले, पान २ वर...



# आरोग्य क्षेत्रात मिळविली शासकीय नोकरी!

**सक्सेस : माजी आ.पृथ्वीराज साठेंकडून कौतुकाची थाप!**

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील मौजे धर्माळा येथील सोळंके (राऊत) यांनी मुंबईमध्ये आरोग्य क्षेत्रात शासकीय नौकरीत यश मिळवले आहे. त्याबद्दल केज विधानसभा मतदारसंघांचे माजी आमदार पृथ्वीराज साठे आणि केज विधानसभा अध्यक्ष सुरेश तात्या पाटील यांनी त्यांचा गौरव करुन सत्कार - केला व शुभेच्छा दिल्या आहेत. याबाबत अधिक वृत्त असे की केज तालुक्यातील मौजे धर्माळा येथील ज्योती ज्ञानेश्वर सोळंके (राऊत) या मुंबई मध्ये आरोग्य क्षेत्रात साह्यकारी परिचारिका म्हणून शासकीय नौकरीत नुकत्याच यशस्वी झालेल्या आहेत. या निमित्ताने केज त्यांचे पान २ वर...

# जमिनीच्या मोजणीसाठी उपोषण

**आक्रमक : शासन,प्रशासनाने दखल घ्यावी**

कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्यातील संयुक्त जमिनीची व गावठाण मोजणी करण्याच्या मागणीसाठी निमगाव चोभा (ता आष्टी) येथील सामाजिक कार्यकर्ते कांतीलाल गि-हे यांनी मागील सहा दिवसापासून गावात श्रीराम मंदिरात आमरण उपोषण सुरू केले आहे. मात्र प्रशासनाकडून अद्याप त्यांच्या उपोषणाची दखल न घेतल्यामुळे गि-हे यांनी उपोषण चालू ठेवून उद्यापासून पाणी देखील घेणार नसल्याचे पत्रकारांशी बोलताना सांगितले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की आष्टी तालुक्यातील निमगाव चोभा येथील सामाजिक कार्यकर्ते कांतीलाल गि-हे यांनी महाराष्ट्र राज्यातील संपूर्ण संयुक्त जमिनीची मोजणी व गावठाण मोजणीसह शिवरस्ते सर्वे नंबर रस्ते मोजणी करण्यासाठी दि.१/०३/२०२४ रोजी प्रशासनाला उपोषण करण्याबाबत निवेदन दिले होते. मात्र या संदर्भात प्रशासनाकडून कुठलीही कार्यवाही झाली नाही. त्यामुळे कांतीलाल गि-हे यांनी दि.१/०८/२०२४ पासून निमगाव चोभा येथील श्रीराम मंदिरात उपोषण सुरू केले असून, उपोषणाचा आज सहावा दिवस आहे.




सामाजिक कार्यकर्ते कांतीलाल गि-हे यांच्या उपोषणस्थळी तहसीलदार प्रमोद गायकवाड, मंडळाधिकारी वर्धमान देवधरे, तलाठी राऊत नाना, भूमी अभिलेख निरिक्षक विजय गायकवाड यांनी यांनी भेट देऊन आपल्या मागण्यासंदर्भात वरिष्ठांना कळविण्यात आल्याचे प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

# केजमध्ये उमेदवारांची चेंगराचेंगरी !

**संभ्रम: खा.सोनवणे कोणाला पसंती देणार!**

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज अंबाजोगाई विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर येऊन ठेपली आहे त्यामुळे शरद चंद्रजी पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून विधानसभेसाठी उमेदवारी कुनाला जाहिर करण्यात आलेली नाही त्यामुळे केज विधानसभा मतदारसंघाची उमेदवारी प्रेत्यक भावी उमेदवाराला वाटत मला उमेदवारी मिळावी त्यामुळे केज अंबाजोगाई मतदार संघातील भावी उमेदवारांची शरद चंद्रजी पवार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कडे धाव घेतली आहे त्यामुळे केज मतदार संघात शरद चंद्रजी पवार साहेब यांच्या राष्ट्रवादीची उमेदवारी भेटावी म्हणून अनेक भावी उमेदवारांची चेंगराचेंगरी होत आहे व भावी उमेदवर खाासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या बंगल्यावर धाव घेत आहेत कारण जिल्ह्याचे सुत्रधार सिंघम खासदार बजरंग सोनवणे आहेत हे भावी उमेदवारांच्या लक्षात आले आहे.कारण जगावेगळी लोकसभा झाली आहे तसेच केज विधानसभा वेगळी होण्याचे चिन्ह दिसत आहेत



कारण विद्यमान आमदार नमीता मुंदडा यांनी पंचवीस तीस वर्षे झाले केज मतदार संघाचा विकास शुन्य केला आहे त्यामुळे आमदारा नमीता मुंदडा यांना जनता जनार्दन खाली मुंडी वरी पाय केल्याशिवाय सोडनार नाही व जरांगे फॅक्टर लोकसभेला चालला आहे व विधानसभेला सुध्दा चालनार आहे असे चिन्ह मतदारात दीसत आहेत व मराठा समाजाला पाहीजे ते आरक्षण न दील्यामुळे महायुतीचा कोनताही उमेदवार असेल तरी व भाजप पक्षावरील जनतेची नाराजी असल्यामुळे शरद चंद्रजी पवार राष्ट्रवादी पक्षाकडे केज अंबाजोगाई मतदार संघातील भावी उमेदवारांची चेंगराचेंगरी होतात दीसत आहे. पान २ वर...

# ...तरच समाजात सन्मान मिळतो

**सुशांत पवार : लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात मार्गदर्शन**

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

मुलींनी आपले शिक्षण पूर्ण करुन स्वतःच्या पायावर उभे राहिले तरच समाजात मान सन्मान मिळतो असे प्रतिपादन गर्देवाडीचे सरपंच सुशांत पवार यांनी केले. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात ११ वीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या वेलकम कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.



लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी महाविद्यालयात ११ वीला नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास गर्देवाडीचे सरपंच तथा युवा उद्योजक सुशांत पवार, संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा प्रसाद देशमुख, महाविद्यालयातील इतिहास विभाग प्रमुख प्रा डॉ विनोद जगतकर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते माता सरस्वती व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर ११ वी व १२ वीच्या विद्यार्थिनींनी मनोगते व्यक्त केली. यामध्ये नेतल शर्मा, कु.मुरकुटे, कु.गायकवाड, कु. कदम तर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सुशांत पवार म्हणाले की, विद्यार्थिनींनी आपले उच्च शिक्षण पूर्ण केले पाहिजे. शिक्षणाने मुलींना समाजात सन्मान मिळतो. मुलगी पान २ वर...



# गरजवंत विद्यार्थ्यांना शालेय गणवेशाचे वाटप

**ऋणानुबंध :आपेगावच्या संत ज्ञानेश्वर विद्यालयात उपक्रम**

पैठण/पुण्यभूमी प्रतिनिधी

आदिशक्ती महिला नागरी सहकारी पतसंस्था पैठण व डॉ. सुभाष घाटकर संचालक आरोग्य व उद्योग विभाग महाराष्ट्र राज्य मंत्रालय मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने संत ज्ञानेश्वर विद्यालय आपेगाव येथे आज ज्ञानेश्वर महाराज मंदिर संस्थेतील गरजवंत, होतकरू व गुणवंत विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आले.

यावेळी प्रतिष्ठान महाविद्यालयाचे श्री गव्हाणे सर, श्री युवराज औटे सर,श्री अमोल म्हस्के सर, प्राध्यापक गायकवाड मॅडम ,प्राध्यापक राजपूत मॅडम तसेच संत ज्ञानेश्वर विद्यालय आपेगाव चे मुख्याध्यापक श्री कल्याण म्हस्के व शाळेतील शिक्षक श्री नवथर,श्री काकासाहेब लिपाने, विवेक भोसले, संभाजी चिरखे , गंगाधर शिंदे ,सतीश आंधळे, प्रवीण पोकळे, दिपक लसगरे, सोनवणे श्रीमती घनवट मॅडम,आहेर व विद्यार्थी उपस्थित होते.

## कौतुकास्पद : डॉ.दिपाताई क्षीरसागरांचा अनोखा उपक्रम

# बीडमध्ये फिरते बाल वाचनालय सुरु

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

शहरातील संभाजी प्राथमिक शाळेत बालरंगभूमी परिषदेच्या राज्य उपाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष डॉ.दिपाताई क्षीरसागर यांच्या पुढाकारातून फिरत्या बालवाचनालयाचे उद्घाटन मंगळवारी (दि.६) करण्यात आले.

कार्यक्रमास बालरंगभूमी परिषदेच्या डॉ.दुष्यंता रामटेके, अनुराधा चिंचोलकर, प्रा.अनिता शिंदे, प्रा.विजयकुमार राख, प्रा.सुरेश थोरात, चंदनशिव, सुरेश साळुंके, मुख्याध्यापिका भोज खरसाडे, रणखांब, वीर, धर्मे, वायभट आदींची उपस्थिती होती. उद्घाटन प्रसंगी शाळेच्या विद्यार्थ्यांनी बालगीते, राज्य गीत, देशभक्तीपर गीते गायली आणि नृत्याचे सुंदर असे सादरीकरण केले.बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष निलमताई शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम राबविण्यात येतात. त्याचा भाग म्हणून डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी फिरते वाचनालय सुरु केले आहे. या उपक्रमामध्ये दोन पेट्या तयार करण्यात आलेल्या असून एक जिल्ह्यासाठी तर दुसरी तालुक्यासाठी असेल. ज्यामध्ये बालक, कुमारवयीन मुलांसाठी गोष्टींची पुस्तके, बोधकथा, बालगीते, समाजसुधारकांचे विचार अशी अनेक बालसंस्कार आणि बाल मनोरंजन करणारी पुस्तके आहेत. १० दिवस ही पुस्तक पेटी एका शाळेत मुलांना वाचनासाठी उपलब्ध राहील. पुढे १० दिवसांनी दुसर्या शाळेत फिरवल्या जाईल, असे हे फिरते बाल वाचनालय आहे. यावेळी ग्रंथालय प्रमुख डॉ.शेख यांनी शिक्षक, विद्यार्थ्यांना पुस्तके वाचनासंबंधी सूचना दिल्या. संभाजी शाळेच्या मुख्याध्यपिका वीणा भोज यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन वीर यांनी केले. आभार डॉ.दुष्यंता रामटेके यांनी मानले.



### शाळांनी उपक्रमाचा लाभ घ्यावा

सध्या मुले लहानपणापासूनच मोबाईलच्या आहारी जाऊन, डोळ्याचे विकार असतील व इतर आजार किंवा डिप्रेशनने ग्रासलेले दिसतात. तेव्हा वाचन संस्कृती वृद्धिंगत करून हा संस्कार बाल मनावर रुजवावा. या उद्देशाने फिरते बाल वाचनालयाची सुरवात करण्यात आली आहे. सर्व शाळांनी उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे मत बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी व्यक्त केले.

# दोन हजार कोटीचा निधी गेला कुठे?

**सवाल : आ.नमितांवर मतदारांनाचा रोष वाढला!**

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

एस कंट्रक्शनच्या कामावर केज आंबेजोगाई मतदार संघातील जनता नाराज असल्याचे समजले जाते आहे.तसेच डांबरी रोड, सिमेंट रोड, नाली रस्ते, चे अनेक काम एस कंट्रक्शनला दिल्यामुळे कार्यकर्त्यात मोठी नाराजी आहे आमदार नमिता मुंदडा ,नंदकिशोर मुंदडा ,अक्षय मुंदडा यांच्या भोवती चार-चार मुंडके जुनेच आहेत केज अंबाजोगाई नवीन जुन्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना नमिता मुंदडा परिवाराच्या जवळ जाण्यापासून रोखलं जातं कार्यकर्त्यात रोष व्यक्त होत आहे गुत्तेदाराचे लाड मुंदडा परिवाराला भोवणार आमदार नमिता मुंदडा यांनी कोट्यावधी रुपयाचा निधी आणून कागदावर विकास तर केला आहे. परंतु अक्षरशा विकास कुठे आहे हे



केज मतदार संघातील जनतेला दिसेना झाले आहे.आमदार नमिता मुंदडांच्या सोशल मीडियावरती मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री असा विविध मंत्र्यांकडून एवढा एवढा निधी आणला जातो पण तो निधी कुठे खर्च झाला केज अंबाजोगाई मतदार संघातील जनतेला दिसेना झाले मतदारसंघात चर्चा ला उधान आहे का निधी आणुन स्वता घशात घालण्याचा प्रयत्न केला आहे असा प्रश्न उपस्थित होतो आहे. तसेच केज आंबेजोगाई मतदारसंघांमध्ये यावेळेस मागासवर्गीय समाजातील उमेदवाराला निवडून देण्याची चर्चा जोर धरू लागली आहे या चर्चेमुळे नमिता मुंदडा परिवाराला राजकीय वर्तुळामध्ये मोठा धक्का बसनार आहे परंतु यामध्ये सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे गेल्या अनेक दिवसांपासून केज मतदार संघामध्ये निवणुकीमध्ये लोकप्रिय ठरलेल्या अंजलीताई घाडगे यांना जर भाजप किंवा राष्ट्रवादीने उमेदवारी दिली किंवा पृथ्वीराज साठे, संगिता ठोंबरे या तीन उमेदवारा पैकी ऐक उमेदवार पुढील मतदार संघाचा आमदार असू शकतो त्यामुळे विद्यमान आमदार नमीता मुंदडा परिवाराचा वरती अनेक कारणामुळे लोक केज अंबाजोगाई मतदार संघामध्ये नाराज आहेत त्यामुळे आमदार नमीता मुंदडा यांचा पराभव येणाऱ्या काळात निश्चित आहे.